




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक ३१९ * नांदेड * शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ठरलेल्या वेळेतच

## ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या ठिकाणी नव्याने सोडत; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर दि. २८ नोव्हेंबर रोजीपुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता राज्याचे निवडणूक आयोग सक्रिय झाल्याचं दिसतं आहे. निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण मर्यादा ओलांडणार नाही, त्यासाठी जिथं जास्त आरक्षण कोटा असेल तिथं पुन्हा सोडत करण्यात येणार असल्याची सूत्रांनी माहिती दिली. सुप्रीम कोर्टातील पुढील सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे. मात्र सर्व निवडणुका कोर्टाच्या संभाव्य आदेशाधीन राहणार आहेत.

२८८ नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहे. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहणार, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला स्थगिती न देता ती ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया कायम राहणार आहे. मात्र ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे त्या ठिकाणचा निकाल हा न्यायालयाच्या संभाव्य निकालाच्या अधीन राहील असा निर्णय दिला आहे. तसेच राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महालिकेच्या निवडणुकीत आरक्षणाची मर्यादा न ओलांडता निवडणुका घ्या असे निर्देशही दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे त्या जिल्हा परिषद आणि २ महापालिकांमध्ये नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. जिथ जास्त आरक्षण झाले तिथं महिला ओबीसी, महिला आरक्षण सोडत नव्याने काढण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

नव्यानं आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक व्हावे यासाठी हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या निवडणुका लांबणीवर पडतील याची शक्यता कमी आहे.

## महाराष्ट्रातील ७५ गावं स्मार्ट होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील गावांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाची गंगा पोहोचावी यासाठी राज्य सरकार अभिनव उपक्रम राबवत आहे. यासाठीच राज्यात स्मार्ट आणि इंटेलिजंट व्हिलेज प्रकल्प राबविण्यात येणार आहे. याकरिता बारामतीसह काटोल, चांदुरबाजार, कळमनुरी आणि वैभववाडी या पाच तालुक्यांतील ७५ गावांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. निवडलेल्या गावांमध्ये सीसीटीव्ही, वाय-फाय, हॉटस्पॉट, डिजिटल शिक्षणासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा उभारण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, हिंगोली, पुणे व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील एकूण ७५ गावांमध्ये या प्रकल्पाचा प्रायोगिक तत्त्वावर विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारने केला आहे. बारामती आणि काटोल तालुक्यातील प्रत्येकी दहा गावांमध्ये तसेच कळमनुरी तालुक्यातील अकरा गावांमध्ये, चांदुरबाजार तालुक्यातील २३ तर वैभववाडी तालुक्यातील २१ गावांमध्ये प्रकल्प राबवला जाणार आहे.

# शहरातील बेशिस्त वाहतुकीचा बळी; हायवाच्या धडकेत तीन वर्षीय चिमुकला ठार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** समृद्धी महामार्गाच्या कामावर चालणाऱ्या रिकाम्या हायवा चालकाने पादचारी जेष्ठ नागरिक व लहान मुलास धडक दिली. या धडकेत तीन वर्षीय बालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी पीव्हीआर सिनेमा असलेल्या मॉलसमोर घडली. या घटनेनंतर जमावाने हायवा चालकास अटक करण्याच्या मागणीसाठी आयजी ऑफिससमोर गर्दी केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनास्थळी व परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.







नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात नागेश राजेश भुतके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास माझे वडिल नामे राजेश माधवराव भुतके हे नेहमीप्रमाणे जॉगिंगला जात असताना माझा भाचा नामे प्रणव संपत आचार्य (वय ३) हा पण माझ्या वडिलांसोबत गेला होता. मला कॉल आला व सांगितले की, तुझे वडील व भाचा जॉगिंग करुन परत येत असताना पीव्हीआर मॉलसमोरील चौकात रोडवर अचानकपणे एक टाटा कंपनीचा हायवा टिप्पर क्रमांक आरजे ०४ जीडी ८७५१ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील सदर हायवा हा हायगयने व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवून भाच्यास व वडिलांस जोराची धडक दिली. या धडकेत भाचाच्या डोक्यास व पायास गंभीर मार लागून तो जागीच मरण पावला व माझ्या वडीलांचा उजव्या पाय मोडला असून पोटास मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना शासकिय दवाखाना विष्णुपुरी येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पीव्हीआर चौक कौठा येथे आलो असता माझ्या भाचास व वडीलांस शासकिय दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे माझा छोटा भाऊ योगेश राजेश भुतके व इतर लोकांनी घेऊन गेल्याबाबत माहिती समजल्याने मी लागलीच शासकिय दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे गेलो. तेथे गेले असता डॉक्टरांनी माझा भाचा प्रणव संपत आचार्य यास मयत घोषीत केले होते व माझे वडीलांवर उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी आरोपी चालक नामे केसा रामथाना राम, वय ४० वर्ष व्यवसाय चालक रा.रायको की ढाणी सरणू पणजी, बाईमेर राजस्थान याने त्याचे ताब्यातील सदर वाहन हे हायगय व निष्काळजीपणे धडक देऊन माझ्या भाचास कारणीभूत ठरला असे तक्रारीत नमूद केले आहे. या प्रकरणी हायवा चालक-मालक यास अटक केली असून गुन्हा दाखल केला आहे.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव व ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# निवडणुकांमध्ये पैशाचा धूर निघतोय, हा मतांचा लिलाव आहे का? -उद्धव ठाकरे

**मुंबई (प्रतिनिधी)–** निवडणुकांच्या तोंडावर पैशाची उधळण होत असून हा सत्तेचा माज आहे. भ्रष्टाचाराच्या ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याची टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. मतांचा लिलाव सुरू आहे का? असा थेट प्रश्न उपस्थित करत त्यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, निवडणुकीत पैशाच्या थैल्या उघडल्या जात आहेत. हा पैसा येतो कुठून? याचं उत्तर कोणाकडेच नसल्याचे ते म्हणाले. एक प्रकारचा सत्तेचा माज, सत्तेचा दर्प या राज्यकर्त्यांच्या वागणुकीतून महाराष्ट्र पाहतो आहे, अशा शब्दात त्यांनी हल्ला चढवला. ते म्हणाले की, आज एकही मंत्री शेतकऱ्यांमध्ये जात नाही, नागरिकांशी संवाद साधत नाही. ना शेतकऱ्यांचं ऐकणारे, ना शहरातील नागरिकांचा आवाज ऐकणारे हे असल्याचे ते म्हणाले.

मुंबईमध्ये गेले दोन-तीन वर्षे प्रदूषण असह्य झाले असून शहराच्या हवेत माणसाच्या आरोग्याला घातक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. हे प्रदूषण फक्त धूळ-धूराचं नसून, हा भ्रष्टाचाराच्या ज्वालामुखीचा उद्रेक आहे, त्यातून उठलेले भ्रष्टाचाराचे ढग संपूर्ण महाराष्ट्रावर घोंगावत आहेत, असा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, मी मुख्यमंत्री झालो तेव्हा आरे कारशेडला तत्काळ स्थगिती दिली होती. पण आता पुन्हा झाडांची कत्तल करून विकासाच्या नावाखाली कंत्राटदारांचा विकास सुरू आहे. संजय गांधी नॅशनल पार्कलाही 'बोडखं' करण्याचे डावपेच सुरू असून त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे तपोवनचा नाश असल्याचे ठाकरे म्हणाले.

## राजेश अगरवाल राज्याचे नवे मुख्य सचिव

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याच्या मुख्य सचिव पदाची जबाबदारी राजेश अगरवाल यांच्या खांद्यावर येणार आहे. सध्याचे मुख्य सचिव राजेश कुमार मीना हे ३० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. त्यांच्यानंतर १ डिसेंबरपासून राजेश अगरवाल हे मुख्य सचिव असतील. राजेश अगरवाल हे १९८९ बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांच्याकडे या आधी केंद्र सरकारच्या दिव्यांग खात्याच्या सचिवपदाची जबाबदारी होती.

## नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १ डिसेंबरला रात्री १० पर्यंत प्रचाराची मुदत

**मुंबई (प्रतिनिधी)–** नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदींनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.

# राज्यातील शाळांची होणार एकाचवेळी पटपडताळणी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची विशेष पथकाद्वारे एकाच वेळी पडताळणी करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यासाठी १५ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून, या पडताळणीमध्ये अनियमितता किंवा चुकीच्या पद्धतीने विद्यार्थ्यांची नोंद केल्याचे आढळून आल्यास सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.



प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. शरद गोसावी यांनी या बाबत संयुक्त परिपत्रकाद्वारे राज्यातील विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुखांना सूचना दिल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून संचमान्यता यूडायस प्लस प्रणालीमधील मुख्याध्यापकांनी नमूद केलेल्या माहितीच्या आधारे केली जाणार आहे.

त्यासाठी यूडायस प्लस प्रणालीमध्ये मुख्याध्यापक लॉगिनद्वारे माहिती भरण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांची माहिती संचमान्यतेसाठी विचारात घेतली जाते. या माहितीचे प्रमाणीकरण, सत्यता पडताळणीची जबाबदारी ही केंद्रप्रमुख आणि गटशिक्षणाधिकारी यांची आहे. त्यामुळे केंद्रप्रमुखांनी काळजीपूर्वक त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करणे आवश्यक आहे. त्यात अनियमितता आढळल्यास त्याची जबाबदारी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक यांच्यावर निश्चित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## भारतातून अफगाणिस्तानला ७३ टन मदत रवाना

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पाकिस्तान वारंवार अफगाणिस्तानवर हल्ले करत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने अफगाणिस्तानला ७३ टन मदत विशेष विमानाने रवाना केली आहे. या मदतीत औषधांचा साठा, लसचा साठा, अनेक अत्यावश्यक पदार्थ आहेत. ही मदत अफगाणिस्तान सरकारच्या आरोग्य विभागाला सुपूर्द करण्यात आली आहे. भारताकडून मिळालेल्या मदतीसाठी अफगाणिस्तानने मोदी सरकारचे आभार मानले आहेत.

## भारतीय अर्थव्यवस्थेची दुसऱ्या तिमाहीत जीडीपीमध्ये ८.२ टक्क्यांपर्यंत वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने शुक्रवारी २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीसाठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर जाहीर केला. सप्टेंबरमध्ये संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा जीडीपी ८.२ टक्क्यांनी वाढला. गेल्या सहा तिमाहींमधील हा सर्वाधिक दर आहे. ही माहिती शुक्रवारी, २८ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीत देण्यात आली आहे.

मागील आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ५.६ टक्के होता. चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून जीडीपी वाढीचा दर ७.८ टक्के होता. जीएसटी दरांमध्ये कपात झाल्यानंतर वापर वाढेल, या अपेक्षेने कारखान्यांनी उत्पादन वाढवले, ज्यामुळे जीडीपी वाढीला हातभार लागला. शिवाय, आजची आकडेवारी आरबीआयच्या ७ टक्क्यांच्या अंदाजापेक्षाही जास्त आहे.









# शुक्रवार आठवडी बाजार आता इंदिरा गांधी मैदान व रोड नं. २६ वर भरणार

## महापालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईने स्थलांतर



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिका हद्दीत दर शुक्रवारी व्हीआयपी रोडवर भरणाऱ्या आठवडी बाजाराचे स्थलांतर करण्यात आले असून आता हा आठवडी बाजार इंदिरा गांधी मैदान व रोड नं.२६ वर भरविला जाणार आहे. शुक्रवार, दि.२८ नोव्हेंबर रोजी महापालिका व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने जंबो कारवाई करत व्हीआयपी रोडवर भरविण्यात येणाऱ्या बाजारास मज्जाव करीत शेतकरी व व्यापाऱ्यांना पर्यायी जागेत स्थलांतरीत केले.

महापालिका हद्दीमध्ये शुक्रवारचा आठवडी बाजार हा साठे चौक ते आयटीआयकडे जाणारा रस्ता व शिवाजीनगर ते ज्योती टॉकीज रोड त्याचप्रमाणे गोकुळनगर ते रेल्वे स्टेशन या मार्गावर भरत असल्यामुळे वाहतूक व रहदारीस अडथळा निर्माण होत असे. त्याचबरोबर रस्त्यावर ये-जा करणाऱ्यांना अडचण निर्माण होत असल्यामुळे सदरील बाजार इतरत्र ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे महापालिका प्रशासनाच्या विचाराधीन होते. त्याअनुषंगाने पालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत वृत्तपत्रामध्ये जाहिर सूचना प्रसिध्द करुन शुक्रवारचा आठवडी बाजार नेहमीच्या ठिकाणी न भरवता भाजीपाला विक्रेते व शेतकरी बंधुंनी इंदिरा गांधी मैदान व रोड नं.२६ वर बाजार भरवण्यात यावा असे पालिकेने स्पष्ट केले होते. त्याचाच भाग म्हणून पालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्त मोहिम राबवून सदरील आठवडी बाजाराचे स्थलांतर केले. या बाजार स्थलांतरणाच्या ठिकाणी पालिकेमार्फत पिण्याच्या पाण्याची, रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे, सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून पोलीस पथक सुध्दा उपस्थित असणार असून यापुढे सुध्दा बाजारास आवश्यक असणाऱ्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन पालिका प्रशासनाने दिले आहे. (पान ६ वर...)

## गोकुळनगरात भाजीपाला विक्रेते संतप्त



महापालिका प्रशासनाने शुक्रवारचा बाजार रस्त्यावर भरवू नका व वाहतुकीस अडथळा निर्माण करू नका, असे निर्बंध घातले होते. त्यामुळे गत अनेक वर्षांपासून शहरातील गोकुळनगरात भरत असलेल्या शुक्रवार बाजारातील भाजीविक्रेते शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी संतप्त झाले व त्यांनी रस्त्यावर भाजीपाला फेकत तसेच मनपा प्रशासन व पोलीस प्रशासनाचा निषेध करीत आंदोलन केले. त्यामुळे शुक्रवारच्या बाजारात तणाव निर्माण झाला होता. पोलीस प्रशासन व महापालिका प्रशासनाचे ऐकून भाजीपाला विक्रेत्यांनी इंदिरा गांधी मैदान तसेच रोड नं. २६ च्या रस्त्यालगत भाजीपाला विक्री करण्याचा निर्णय घेतल्याने संभाव्य वाहतुकीचा खोळंबा टळणार आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बहुस्तरीय हवाई संरक्षण : आत्मनिर्भर भारताच्या सुरक्षेचा नवा टप्पा

भारतीय लष्कराने नुकत्याच केलेल्या बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणालीच्या यशस्वी चाचणीने देशाच्या संरक्षण क्षमतेत एक महत्त्वाचा मैलाचा दगड उभारला आहे. ही चाचणी केवळ तांत्रिक प्रगतीचे द्योतक नसून, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या बळावर भारत आपले सामरिक स्वातंत्र्य आणि आंतरराष्ट्रीय स्थान अधिक मजबूत करत असल्याचे स्पष्ट संकेत देणारी आहे. याही क्षेत्रामध्ये स्वदेशी तंत्रज्ञानाची कास धरण्यात आली आहे. रशिया, अमेरिका किंवा चीनसारख्या देशांनी पूर्वीपासूनच त्यांच्या संरक्षण प्रणालींसाठी स्वदेशी तंत्रज्ञानावर भर दिला आहे. भारतही याच दिशेने पावले टाकत आहे. भारतीय संरक्षण संशोधन आणि विकास संघटना यांनी विकसित केलेली इंटिग्रेटेड एअर डिफेन्स वपन सिस्टीम ही त्याच स्वावलंबनाची साक्ष आहे. ओडिशाच्या किनारपट्टीवर झालेल्या यशस्वी चाचणीत या प्रणालीने वेगवेगळ्या उंचीवर आणि अंतरावर असलेल्या तीन हवाई लक्ष्यांचा अचूक वेध घेतला. ही बाब भारताच्या हवाई संरक्षणासाठी मोठी आश्वासक गोष्ट ठरते. या तंत्रज्ञानाच्या मदतीने आधुनिक युद्धनीती आखण्यात येत आहे. या प्रणालीत समाविष्ट असलेली जमिनीवरून जमिनीवर तात्काळ मारा करणारी ही क्षेपणास्त्र प्रणाली लष्कराच्या चिलखती तुकड्यांना त्वरित संरक्षण देऊ शकते. ३ ते ३० किलोमीटर अंतरावरील हवाई धोक्यांचा मुकाबला करण्याची क्षमता असलेली ही प्रणाली कोणत्याही रणभूमीवर त्वरित तैनात केली जाऊ शकते. विशेष म्हणजे ही प्रणाली शत्रूच्या ड्रोन, हेलिकॉप्टर, फायटर जेट्स किंवा मिसाईल्स यांच्यापासून संरक्षण करते. यामध्ये दोन शक्तिशाली रडार्स, एक प्रगत लाँचर आणि पूर्णतः स्वयंचलित कमांड अँड कंट्रोल सिस्टीमचा समावेश आहे. ही प्रणाली लष्कर, नौदल आणि वायुदल या तिन्ही दलांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आली आहे. या संदर्भात करण्यात आलेला लेझर शस्त्रास्त्रांचा प्रयोग यशस्वी झाला आहे. चाचणीत समाविष्ट करण्यात आलेली डिरेक्टेड एनर्जी वेपन प्रणाली म्हणजे भारताच्या संरक्षण तंत्रज्ञानाची अजून एक मोठी झेप. 'चेस' संस्थेने विकसित केलेल्या या लेझर आधारित शस्त्रप्रणालीने ड्रोनच्या गटांवर अचूक प्रहार करत त्यांची संपूर्ण प्रणाली निष्क्रिय केली. याचा वापर केवळ लक्ष्य नष्ट करण्यापुरता मर्यादित नसून, ड्रोन यांचे सेन्सर, कॅमेरे, आणि कम्युनिकेशन सिस्टीम्स नष्ट करण्यासाठी सुद्धा होतो. सध्या या प्रणालीचा पल्ला ३ किलोमीटरपर्यंत मर्यादित आहे, परंतु भविष्यात त्याचा विस्तार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकतेच सुरू करण्यात आलेल्या मिशन सुदर्शन चक्र प्रणालीमुळे भविष्यातील दिशा बदलणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घोषित केलेल्या 'मिशन सुदर्शन चक्र' अंतर्गत भारताच्या संरक्षण कवचाला आधुनिक आणि बहुस्तरीय बनविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला होता. या चाचणीतून हेच अधोरेखित होते की भारत त्या दिशेने प्रभावीपणे वाटचाल करत आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश म्हणजे हवाई, जल आणि स्थल मार्गांवर सुरक्षेची अनेक थरांनी बांधणी करणे, शत्रूच्या संभाव्य हल्ल्यांना त्वरित प्रत्युत्तर देणे, आणि देशाच्या सीमांना अभेद्य बनवणे. या सर्व बाबीवरून संरक्षण क्षेत्रातील आपल्या देशाची वाढती सामरिक स्वायत्तता सिद्ध होते आहे. या स्वदेशी प्रणालीमुळे भारताच्या सामरिक स्वायत्ततेला चालना मिळाली आहे. आजवर आपण अनेकदा परदेशी संरक्षण उपकरणांवर अवलंबून होतो, मात्र आता परिस्थिती बदलते आहे. देशांतर्गत संशोधन, डिझाईन, चाचणी आणि उत्पादन हे चारही टप्पे भारतातच पार पडत असल्याने, धोरणात्मक निर्णयात अधिक लवचिकता आणि जलद अंमलबजावणी शक्य होते. यामुळेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे उच्च स्थान निश्चित झाले आहे. अमेरिका, चीन, इस्रायल आणि रशिया यांसारख्या मोजक्या देशांकडे अशी बहुस्तरीय आणि स्वदेशी हवाई संरक्षण प्रणाली आहे. आता भारतदेखील या सामरिक महासत्तांच्या यादीत सामील झाला आहे. अण्वस्त्र शक्ती, अंतराळ तंत्रज्ञान, आणि सायबर सुरक्षा यामध्ये यापूर्वीच भारताने आपली छाप सोडली आहे. हवाई संरक्षणाच्या या पातळीवर पोहोचणे म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला आपली अडवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या देशांसाठी एक मोठा संदेश आहे. आपल्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शेती, तंत्रज्ञान आणि संरक्षण या आत्मनिर्भरतेच्या तीन दिशा आहेत आणि याच दृष्टीने वाटचाल देखील चालू आहे. आज भारत शेतीत आत्मनिर्भर होण्याच्या मार्गावर आहे, माहिती-तंत्रज्ञानात आघाडीवर आहे, आणि आता संरक्षण तंत्रज्ञानातही आत्मनिर्भर होत आहे. ही त्रिसूत्री भारताला केवळ आर्थिक महासत्ता बनवत नाही, तर एक सशक्त, सुरक्षित आणि सामरिकदृष्ट्या स्वयंपूर्ण राष्ट्र म्हणून उभं करत आहे. आपल्या शास्त्रज्ञांनी विकसित केलेली ही बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणाली केवळ एक तांत्रिक प्रगती नाही, तर ही भारताच्या संरक्षण स्वावलंबनाची ठोस पावले आहेत. यामुळे भारताची अंतर्गत सुरक्षितता तर वाढेलच, पण जागतिक स्तरावरही आपली भूमिका अधिक दृढ आणि प्रभावशाली होईल. यामुळेच भारत आता केवळ 'शक्तीशाली राष्ट्र' नाही, तर 'सजग आणि आत्मनिर्भर शक्ती' बनत आहे.

कर्तबगार महिलांची यशोगाथा

# कर्तबगार महिलांची यशोगाथा : सुवर्णकन्या पी. टी. उषा



आपण पाहतच आहोत की, भारतीय क्रीडा क्षेत्र हे आज जागतिक पातळीवर आपलं स्थान प्रत्येक क्रीडा प्रकारात कायम करत आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या बहुतांश क्रीडा प्रकारात भारताचा सहभाग तर आहेच परंतु बाजी मारण्याचे प्रमाणही बहुतांशच आहे. आज या यशोगाथेच्या माध्यमातून आपण अशाच एका खेळाडू धावपटूला या माध्यमातून अनुभवणार आहोत. भारताची सुवर्णकन्या, पय्योली एक्सप्रेस, भारतीय धावपटूंची राणी, आशियाई धावपटूंची राणी अशा अनेक संबोधनांनी त्यांचा गौरव केला जातो त्या म्हणजे पी. टी. उषा. त्यांचे पूर्ण नाव पिलावूलकांडी थेक्केपरंबल उषा असे आहे. त्यांनी संघर्ष, मेहनत, चिकाटी करून आपले व भारतीय क्रीडा क्षेत्राचे नाव जागतिक पा-तळीवर नेऊन ठेवले आहे. त्यांचा जन्म २७ जून १९६४ साली केरळ राज्यातील कोझिकोड जवळ सम ुद्र किनारपट्टी लगत असलेल्या पय्योली येथे झाला. भारतातल्या महान खेळाडूंपैकी त्यांची गणना केली जाते.

पी. टी. उषा यांनी खेळाडूंना प्रोत्साहनच दिले नाही तर अनेक खेळाडूंचे जीवन त्यांनी घडवले आहेत. ऑलम्पिक मध्ये केवळ ०.०१ सेकंदाने त्यांचे सुवर्णपदक गेले. हा क्षण त्यांच्यासाठी आणि भारतासाठी खूप कसोटीचा होता. कारण सेकंदापेक्षाही कमी वेळाने सुवर्णपदक गमावणे म्हणजे खूपच कठीण परिस्थिती. परिस्थितीला स्वीकारून परत पुढे जाण्यासाठी खूप मोठा संयम लागतो आणि हाच संयम त्यांच्याकडे होता. उषा यांना केवळ ऑलिंपिकमध्येच अडचण आली असे नाही, तर त्यांचे संपूर्ण आयुष्य हे तारेवरची कसरतच म्हणावे लागेल. बालपणी उषा यांची तब्येत अतिशय नाजूक तर होतीच पण त्या सतत आजारी असायच्या. त्याशिवाय कुटुंब अत्यंत गरीब असल्यामुळे तब्येतीकडे विशेष लक्ष दिले जायचे नाही. गावाजवळच एका शासकीय शाळेत त्यांचा प्रवेश झाला. त्यांना खेळण्याची अत्यंत आवड होती. त्या चौथ्या वर्गात असताना त्यांनी शाळेतील धावण्याच्या स्पर्धेत पहिला नंबर मिळवला. उषा यांची ही आवड बघून त्यांच्या शाळेतील क्रीडा शिक्षकांनी त्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पाठविले. यासाठी त्यांचे काका व आई यांचाही मोठ्या सहभाग होता. जिल्हास्तरीय स्पर्धा त्या जिंकल्या. आणि त्यांनी मागे कधीचपाहिलेनाही.त्यानव्यानेजन्मालाआल्यातेनाजूक उषेपासून भारताला मिळालेली सुवर्णकन्या म्हणूनच. उषा यांनी शालेय जीवनात जिल्हास्तरीय अनेक पदके मिळविली. त्यांच्या या मेहनतीमध्ये त्यांचे कुटुंबीय त्यांच्यासोबत होते. त्या जेव्हा सरावासाठी सकाळी बाहेर पडायच्या त्यावेळी त्यांचे वडील त्यांच्यासोबत यायचे. त्या धावण्याचा खूप कसोशीने सराव करायच्या. शेजारीच रेल्वे पटरी होती. सरावाच्या वेळी एखादी रेल्वे आली की बाजूच्या पटरीवरून त्या रेल्वेसोबत धावण्याचा सराव करत असत. त्याचप्रमाणे आपली पकड अजून मजबूत करण्यासाठी त्या समुद्रकिनारी वाळूम धूनही धावण्याचा सराव करायच्या. त्यांच्या ज्या मेहनतीने अनेक जिल्हास्तरीय स्पर्धा जिंकल्याने त्यांची क्रीडा उपक्रमात निवड केली गेली. त्या ठिकाणी राहण्याची आणि त्यांच्या सरा-वाची व्यवस्था होती. तिथे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. त्याही परिस्थितीत त्यांनी सराव कधी सोडाला नाही. त्याच ठिकाणी ओ. एम. नंबियार हे क्रीडा कोच होते. नंबियार सरांनी उषा यांच्यातील अस्सल गुणवत्तेला ओळखून त्यांच्याकडून तशाच प्रकारची तयारी करून घेतली.

जिल्हास्तरावरून पुढे त्यांची राज्यस्तरीयसाठी निवड केली गेली. तिथेही त्या जिंकत गेल्या. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांची ऑलिंपिक स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांनी १९८० साली मास्को येथे ऑलिंपिक स्पर्धेत पदार्पण केले.१९८४ साली ही ऑलिंपिक गाठणारी पहिली भारतीय महिला धावपटू ठरली. परंतु हाच तो क्षण उषा यांच्यासह संपूर्ण भारतीय क्रीडा प्रेमींच्या अंगावर काटा आणतो. कारण तो ०.०१ सेकंदाने त्यांचे सुवर्णपद हुकले . पण याही क्षणातून त्या खूप काही शिकल्या. त्यांनी सुमारे १०३ आंतरराष्ट्रीय पदके मिळवली आहेत. त्यामध्ये सुवर्ण, रौप्य,कांस्य या पदांचा समावेश आहे. सन १९९१ साली त्यांनी उत्कृष्ट कबड्डी खेळाडू श्रीनिवासन यांच्यासोबत लग्न केले. त्यानंतरही त्यांनी अनेक स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेला होता. आपल्या संपूर्ण यशाचे श्रेय त्या त्यांचे कोच नंबियार सर इतकेच महत्त्व पती श्रीनिवासन यांना देतात.१९९७ या वर्षी त्यांनी निवृत्ती घेतली आणि आपले ऑलिम्पिक मधील अधूरं राहिलेलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी उषा व श्रीनिवासन यांनी कोझिकोड जवळ असलेल्या किनालुर गावात २००२ मध्ये ३९;उषा स्कूल ऑफ थलेटिक्स३९; हे ट्रेनिंग सेंटर सुरू केलं. त्यांच्या या ट्रेनिंग सेंटर मधील टिंटू लुका ही धावपटू ऑलिम्पिक ला ११ व्या स्थानावर होती. जुलै २०२२ मध्ये केंद्र सरकारने त्यांची राज्यसभेत नामनिर्दिष्ट सदस्य म्हणून निवड केली. तर २० जुलै २०२२ मध्ये त्यांनी राज्यसभेच्या सदस्य म्हणून शपथ घेतली होती.

उषा यांच्या क्रीडा क्षेत्रातील महान कार्यासाठी त्यांना देश विदेशातूनही अनेक पुरस्कार बहाल केले गेले. त्यामध्ये प्रामुख्याने. १९८४ साली अर्जुन पुरस्कार. १९८५ साली भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार. १९८५,८६ साली सर्वोत्कृष्ट धावपटू म्हणून सन्मान.२०१९ साली जागतिक ॲथलेटिक्स महासंघा कडून सन्मान. त्याचप्रमाणे त्यांना आयआयटी कानपूर, कानपूर युनिव्हर्सिटी यांची विद्यावाचस्प-तीची मानद पदवी देखील प्राप्त आहे.२०२२ मधे त्या भारतीय ऑलम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदी होत्या.संस्थेच्या ९५ वर्षांच्या इतिहासात पहिली महिला अध्यक्ष ठरल्याचा बहुमान त्यांना मिळाला.

उषा यांनी महिलांसाठी खूप महत्त्वा-चा संदेश दिलेला आहे. हा संदेश बीबीसी न्यूजसाठी जान्हवीमुळे यांनी शब्दांकन केलेला आहे. उषा म्हणतात १९८० च्या दशकात जर मी ऑलम्पिक पदाच्या एवढी जवळ पोहोचले आणि १०३आंतरराष्ट्रीय पदक जिंकू शकले, तेही कुठल्याही सुविधांशिवाय, तर प्रत्येकात ती क्षमता नक्कीच आहे. कदाचित त्यांना खूप अडथळे पार करावे लागतील. खेळात असो वा, अभ्यासात वा आणखी कुठे त्यांनी कोणत्याही सुविधांची वाट पाहता कामा नये. जिंकला नाही तर हरकत नाही निराश होऊ नये, पुन्हा पुन्हा प्रयत्न करत रह-ावे १००% त्या यशस्वी होतील. मंत्र एकच आहे कठोर मेहनत, महिलांसाठी काहीही अशक्य नाही यात शंका नाही. किती सहज वाटणारा पण अत्यंत मोलाचा असा संदेश आहे. त्यांच्या धावण्यात होते भारतीय स्त्रियांचे अस्तित्व, त्यांचा खरा चेहरा, एक देदीप्यमान अस्मिता, अदम्य इच्छाशक्ती. उषा यांचे एक पाऊल म्हणजे सर्व महिलांसाठी एक नवीन मार्ग आहे अशा या सुवर्णकन्येची ही यशोगाथा.

**-डॉ. दिपाली पांडे देशमुख**
संगीत विभाग
पु. अ. होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव

# ठक्कर बाप्पा : समाजसुधारणेचे मानवतावादी रूप



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी केवळ नावाने नाही तर त्यांच्या कृतींनी, त्यांच्या जीवनतत्त्वांनी आणि त्यांच्या समाजकार्याच्या विचारधारेमुळे लोकांच्या मनात कायमस्वरूपी जडतात. समाजातील वंचित, पीडित, व दलित घटकांच्या पुनर्वसनासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजवणाऱ्या, आयुष्यभर जन-सेवा करत राहणाऱ्या, शाळा, वसतिगृहे, उद्योग, वस्ती, रुग्णालये यांची पायाभरणी करणाऱ्या कर्मयोग्यांपैकी एक म्हणजे अर्थातच ठाकुरजी झवेरभाई मोवजीव-ाला, म्हणजेच संपूर्ण भारताला परिचित असलेले ठक्कर बाप्पा. त्यांचे कार्य सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात इतके व्यापक होते की आजही आदिवासी, भटक्या व विमुक्त जमाती त्यांना देवदूत, समाजपिता, अथवा जीवंत गांधी म्हणून ओळखतात.

ठक्कर बाप्पा यांचा जन्म २९ नोव्हेंबर १८६९ रोजी गुजरातमधील भागलपूर (जि. भावनगर) येथे झाला. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण घेतले आणि सरकारी नोकरीत प्रारंभिक काळ घालवला. परंतु १९१४ च्या सुम ारास ब्रिटिशांच्या अंतर्गत कार्यरत असताना त्यांनी प्रथमच आदिवासी भागात काम केले आणि त्या सम ाजातील दारिद्र्य, अशिक्षितपणा, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि सामाजिक बहिष्काराचे परिणाम अतिशय जवळून पाहिले. ही निरीक्षणे पुढे त्यांच्या जीवनातील धर्मवळण बनली. गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेखाली त्यांनी नोकरीचा राजीनामा देत वयाच्या ५० व्या वर्षी संपूर्णपणे समाजकार्याला वाहून घेतलेले जीवन सुरू केले. हीच ठक्कर बाप्पांच्या कार्याची खरी सुरुवात होती.

त्यांनी भारतातील आदिवासी सम ाजाकडे सुधारणा किंवा मदतीची गरज असलेल्या जमातींसारखे पाहिले नाही, तर त्या समाजाला भारताचे आदिम नागरिक, संस्कृतीचे वारकरी आणि निसर्गाचे जिवंत शिलेदार म्हणून मान्यता दिली. त्यांच्या कार्याची मुळे सामाजिक न्याय, समता, अहिंसा आणि मानवी प्रतिष्ठेच्या तत्त्वांमध्ये खोलवर रोवली गेली होती. ते म्हणत ज्या समाजाला आपण मदत करत आहोत, तो गरिब आहे म्हणून नव्हे, तर त्याच्यात प्रचंड सांस्कृतिक वारसा आहे म्हणून त्याला साथ देणे आवश्यक आहे.

ठक्कर बाप्पांनी मानवसेवेला कोणतेही राजकारणाचे स्वरूप दिले नाही. देशभरात त्यांनी ४०० हून अधिक संस्था, शाळा, गुरुकुल, पुनर्वसन केंद्रे, वसतिगृहे आणि आश्रमशाळा उभारल्या. सुरुवा-तीला गुजरात, नंतर महाराष्ट्र, आदिवासी बहुल विदर्भ, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि उत्तर भारतात त्यांनी कामाचा व्याप्तीक्षेत्र विस्तारत नेला. भार-तातील भटक्या आणि विमुक्त जमाती त्या काळी ईीळींळीह ऊीळाळपरश्र ढीळलशी लीं-१८७१ अंतर्गत जन्मजात गुन्हेगार म्हणून घोषित होत्या. हे अन्यायकारक कायदे आणि सामाजिक बहिष्कार ठक्कर बाप्पांना अमानुष वाटत होते. त्यांनी या समाजाच्या पुनर्वसनासाठी मोठ्या प्रम ाणात मोहीम राबविली. पुनर्वसनशिबिरे, शिक्षण, आरोग्यसेवा, शेतीप्रशिक्षण, आणि स्वावलंबनासाठी उद्योगप्रशिक्षण उपलब्ध करून दिले.

आदिवासी भागातील महिलांची स्थिती अत्यंत दयनीय होती. त्या शिक्षणापासून, आरोग्यसेवेपासून आणि सामाजिक समानतेपासून वंचित होत्या. ठक्कर बाप्पांनी महिला सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांना वाटत होते की समाज बदलायचा असेल तर महिला आणि मुलांचे शिक्षण अत्यावश्यक आहे. म्हणून त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र आश्रमशाळा सुरू केल्या. ग्रामीण भागातील पारंपरिक जन्ममृत्यू विधी, मातृआरोग्य, अप-ोषण, व्यसनाधीनता आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांना त्यांनी प्रोत्साहन दिले.

ठक्कर बाप्पांचे कार्य केवळ शिक्षणा-पुरते मर्यादित नव्हते. त्यांनी आदिवासी भागात जलसंधारण, सिंचन, शेतीस-ुधारणा, हस्तकला, विणकाम, बागायती, पशुपालन आणि उद्योगक्षेत्रात देखील कार्य केले. त्यांच्या कार्यातून जन्माला आलेल्या उद्योग केंद्रांनी अनेक आदिवासी कुटुंबांना स्वावलंबन दिले. त्यांच्या दृष्टीने सेवा म्हणजे केवळ दान नव्हे तर सक्षमीकरण, आत्मनिर्भरता आणि स्वाभिमान निर्माण करणे हा उद्देश होता. ते म्हणतः ज्याला आपण मदत देतो, त्याच्या आत्मसन्माना-ची राख राखली पाहिजे, मशाल देणे हे भिक मागण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

त्यांनी सुरू केलेला भिल सेवा मंडळ, भील सेवा संघ, तसेच नंतर स्थापन झालेले ठक्कर बाप्पा आदिवासी विकास म हामंडळ यासारख्या उपक्रमांनी आदिवासी समाजात नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजाच्या शिक्षणात वाढ, आरोग्यात सुधारणा, अंधश्रद्धेपासून मुक्ती, कायदेशीर हक्कांविषयी जागरूकता आणि आर्थिक विकास शक्य झाला.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी अप्रत्यक्षपणे योगदान दिले. गांधीजींच्या असहकार आंदोलनात सहभागी होताना त्यांचे सामाजिक कार्यच सत्याग्रहाचे रूप घेतले. गांधीजी म्हणाले होते: जर मी स्वतः ला गांधी मानत असेन तर ठक्कर बाप्पा हे प्रत्यक्ष गांधी आहेत.

१९५१ साली ठक्कर बाप्पा यांच्या निधनानंतरही त्यांचे कार्य थांबले नाही. त्यांनी निर्माण केलेल्या चळवळी, संस्थात्म क पायाभूत रचना आणि विचारधारा आजही सरकारी पातळीवर आणि स्वयंसेवी क्षेत्रात मार्गदर्शक ठरतात. आज हजारो आश्रम शाळा, विद्यार्थी वसतिगृहे, आदिवासी विकास महामंडळे आणि शासकीय धोरणे त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन कार्यरत आहेत. ठक्कर बाप्पांचे जीवन आपल्याला स्मरण करून देते की समाजातील दुर्लक्षितांसाठी काम करणे म्हणजे केवळ दानधर्म नव्हे, तर समतेची आणि मानवतेची उभारणी करणे होय. त्यांच्या कार्यातून हे सिद्ध झाले की नियोजनबद्ध सेवा, मानवी दृष्टीकोन, सन्मानाधारित सुधारणा आणि लोकशाही मूल्ये या आधारे सामाजिक बदल साधता येऊ शकतो. आज जेव्हा समाज पुन्हा जात, धर्म, आर्थिक विषमता, अंधश्रद्धा आणि असमानतेच्या आव्हानाला सामोरे जात आहे, तेव्हा ठक्कर बाप्पांचे कार्य अधिक अर्थपूर्ण वाटते.

त्यांची जयंती म्हणजे केवळ स्मरणा-चा दिवस नसून मानवता, समर्पण, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादिवस आहे. ठक्कर बाप्पांना खरी श्रद्धांजली म्हणजे त्यांच्या सुरू केलेल्या कार्याचा वारसा पुढे नेणे, आदिवासी समाजाला केवळ शासकीय लाभांच्या चौकटीत न ठेवता त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करणे आणि त्यांच्या संस्कृतीला सन्मानाने स्थान देणे.

आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या विचारांचा पुनरुच्चार केला पाहिजे, मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही, आणि सेवेशिवाय मानवता अपूर्ण आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती...

गुवाहाटी येथे झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला ४०० पेक्षा अधिक धावांनी नमवून दक्षिण आफ्रिकेने भारताला २ - ० असे नमवून व्हाइट वॉश दिला. क्रिकेट रसिकांसाठी हा पराभव धक्कादायक होता कारण पहिल्या कसोटीतही दक्षिण आफ्रिकेने भारताचा असाच लाजिरवाणा पराभव केला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर क्रिकेट प्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे आणि ते साहजिकही आहे कारण भारतीय भूमीवर झालेला हा भारताचा पहिलाच पराभव नाही. मागील वर्षी न्यूझीलंड संघानेही भारताचा असाच लाजिरवाणा पराभव करत मालिका ३ - ० ने जिंकत भारताला असाच व्हाइट वॉश दिला होता. वर्षभरात दोनदा परदेशी संघाने भारताला भारतात येऊन हरवले ते ही अतिशय लाजिरवाण्या पद्धतीने त्यामुळे क्रिकेट प्रेमींमध्ये नाराजीची भावना पसरली आहे.

पूर्वी भारतात येऊन भारताला हरवणे हे परद-ेशी संघासाठी मोठे दिव्य होते. भारतीय भूमीवर भारत अपराजितच होता. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा कोणत्याच संघाला भारतात येऊन मालिका विजय मिळविणे शक्य नव्हते. मालिकेतील एखादा दुसरा सामना ते जिंकायचे पण मालिका मात्र भारतच जिंकायचा. भारताला भारतात येऊन व्हाइट वॉश देणे ही तर अशक्यप्राय गोष्ट होती पण आता मात्र परदेशी संघासाठी ते सहज शक्य झाली आहे. असे काय कारण आहे की भारतीय संघ आपल्याच भूमीवर जिंकू शकत नाही असा प्रश्न क्रिकेट वर्तुळात विचारला जात आहे याचे सरळ आणि साधे उत्तर




आहे ते म्हणजे चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती....या कसोटी मालिकेसाठी जो भारतीय संघ निवडला होता तोच मुळी कसोटी क्रिकेटच्या योग्यतेचा नव्हता. या कसोटी मालिकेसाठी जो संघ निवडला त्यातील किती खेळाडू हे कसोटी खेळण्याच्या लायक होते? हा संशोधनाचा विषय आहे. या संघात जे फलंदाज निवडले त्यांच्याकडे कसोटी क्रिकेटसाठी लागणारे तंत्र आहे का तर याचे उत्तर नाही असेच देता येईल. कसोटी मालिकेसाठी निवडलेला संघ कसोटी दर्जाचा नव्हता. या संघात निवड झालेले खेळाडू हे आयपीएल गाजवलेले धुरंदर होते.

टी २० आणि कसोटी क्रिकेट यात जमीन अस्म ानचा फरक आहे. कसोटीसाठी लागणारे तंत्र आणि संयम या खेळाडूंकडे नाही. फिरकी गोलंदाजी खेळण्यासाठी जे तंत्र लागते ते एकाही फलंदाजाकडे दिसले नाही. निवड समितीने जी चूक केली तीच किंबहुना त्याहून मोठी चूक संघ व्यवस्थापनाने केली. या मालिकेत संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसलेली दिसली. संघ व्यवस्थापनाने रचलेली एकही चाल यशस्वी ठरली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन संघाची घडी बसवताना गोंधळलेला दिसला. पहिल्या कसोटीत चक्क चार फिरकी गोलंदाज खेळवण्यात आले. चार फिरकी गोलंदाज खेळवण्याची संघ व्यवस्थापनाची रणनीती पूर्णपणे फसली. चार फिरकी गोलंदाज खेळवल्यामुळे एक फलंदाज कमी पडला. त्यात शुभमन गिल जायबंदी झाल्यावर आपल्याकडे फलंदाजच उरला नाही कारण यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत हे कसोटीतही टी २० चा खेळ खेळतात. ध्रुव जुरेल हा नवखा फलंदाज असल्याने त्याच्याकडून जास्त अपेक्षा नव्हत्या. उरला एकटा के एल राहुल पण तो ही फॉर्मात नाही मग धावा करणार कोण ? जी गत पहिल्या कसोटीत झाली तीच गत दुसऱ्या कसोटीतही झाली.

दुसऱ्या कसोटीत एक फिरकी गोलंदाज कमी करून नितीश कुमार रेड्डी याला खेळवण्यात आले पण त्याने दुसऱ्या कसोटीत ना गोलंदाजीत विकेट घेतल्या ना फलंदाजीत धावा काढल्या. विशेष म्हणजे दुसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात त्याला फक्त एकच षटक गोलंदाजी दिली. त्याला जर गोलंदाजीच द्यायची नव्हती तर मग त्याला खेळवलेलेच का ? त्याच्या ऐवजी एक स्पेशलिस्ट फलंदाज खेळवला असता तर किमान भारताच्या काही धावा वाढल्या तरी असत्या. पहिल्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर खेळलेल्या वॉशिंग्टन सुंदर दुसऱ्या कसोटीत थेट आठव्या क्रमांकावर आला. दुसऱ्या कसोटीत तिसऱ्या क्रमांकावर आलेला साई सुदर्शन फक्त हजेरी लावून गेला. ध्रुव जुरेलनेही तेच केले. या दोघांनी इंग्लंड दौऱ्यावर देखील काहीच केले नव्हते तरीही त्यांची निवड करण्यात आली. जर योग्य खेळाडूंची निवड झाली असती आणि रणनीती फसली नसती तर असा लाजिरवाणा पराभव झाला नसता. म्हणजेच चुकलेली संघ निवड आणि फसलेली रणनीती यामुळेच हा लाजिरवाणा पराभव भारतीय संघाला स्वीकारावा लागला. या पराभवातून धडा घेऊन बीसीसीआयने निवड समिती आणि संघ व्यवस्थापनाला बरखास्त करायला हवे.

बीसीसीआयने नवीन निवड समिती आणि नवा प्रशिक्षक लवकरात लवकर निवडायला हवा. प्रशिक्षकपदी गंभीर आल्यापासून भारतीय संघाची पिछेहाटच होत आहे विशेष म्हणजे सतत पराभव होऊनही गंभीर आपली रणनीती बदलायला तयार नाही तर निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर हे चुकीची संघ करत आहे. या दोघांचीही गच्छंती करण्याची वेळ आली आहे जर या दोघांना आणखी अभय दिले तर या पराभवाची पुनरावृत्तीच पहायला मिळू शकते.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### तिरंगानगरात महात्मा फुले यांना अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त तरोडा खुर्द क्षेत्रातील तिरंगानगर –रघुनाथनगर वसाहतीत अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे देविदास इंगळे, डॉ. प्रा. सुरेश गजभारे यांनी पुष्पहार अर्पण केला. यानिमित्त एन.एम. कांबळे व प्रा. सुरेश गजभारे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. प्रा. देविदास इंगळे यांनी फुलेंची ग्रंथरचना सांगितली. रामचंद्र देठे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

### सासरच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या विठ्ठलनगर भागात राहणाऱ्या एका विवाहितेने पतीसह अन्य तीन महिलांच्या सततच्या छळाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली. येगाव (ता.कळमनुरी) येथील राजेश्वर श्रीराम वानखेडे (वय ५५) यांची मुलगी प्रतीक्षा ( वय २५ ) हीचे लग्न नांदेडच्या विठ्ठलनगर भागात राहणाऱ्या लक्ष्मण भोसलेसोबत झाले होते. लग्नानंतर काही दिवस पीडीत विवाहितेला सासरी चांगले नांदवले. त्यानंतर आम्हाला मुलगा पाहिजे म्हणून तिचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरू केला. अखेर या छळाला कंटाळून प्रतीक्षा भोसले हिने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पती लक्ष्मण भोसले, माधुरी देशमुख, दिपाली देशमुख, भाग्यश्री देशमुख यांच्याविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# युती तुटताच 'वंचित'ची काँग्रेसवर जोरदार टीका

## ▶ दगाबाजी करणाऱ्या काँग्रेसला हद्दपार करा
## ▶ सुजात आंबेडकर यांचे मुदखेडमध्ये जाहीर सभेत आवाहन



**मुदखेड (प्रतिनिधी) –** नगरपरिषद निवडणुकीतून आंबेडकरी समाजाने काँग्रेस पक्षाला हद्दपार करावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी मुदखेड येथील जाहीर सभेत केले.

वंचित बहुजन आघाडीच्या मुदखेड नगर पालिकेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि.२७) आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कर्नाटकचे मुख्यमंत्री व तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवण रेड्डी यांना काँग्रेसच्या उमेदवार यांच्या प्रचारासाठी नांदेड जिल्ह्यात बोलावण्यात आले होते. कारण काँग्रेसचे नेते सर्व मॅनेज झाले होते, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी मुदखेड येथे जाहीर सभेत केली.

नांदेड जिल्ह्यांसह इतर ठिकाणी वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस यांची युती ठरली होती. परंतु निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून काँग्रेस नेत्याने युती धर्म न पाळता बहुजन वंचित आघाडीच्या उमेदवाराविरुद्ध काँग्रेसने उमेदवार दिले. अशा दगाबाजी करणाऱ्या काँग्रेस पक्षाला हद्दपार करा असे आवाहन केले.

यावेळी ॲड. अविनाश भोसीकर, प्रशांत इंगोले, शाम कांबळे, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रुती बालासाहेब खंडेलोटे, आशालता जीवनराव चौदंते, प्रभाग क्रमांक दोनचे उमेदवार राहुल बबनराव चौदंते, वंचितचे तालुका अध्यक्ष मोहन कांबळे यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने सभेला उपस्थित होते.

# नांदेड शहरात तीन ते चार डिसेंबर दरम्यान जिल्हास्तरीय युवा महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी)–** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०३ से ०४ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्हास्तर युवा महोत्सव सन २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे.

युवा कार्यक्रम खेळ मंत्रालय भारत सरकार यांचे पत्रान्वये राष्ट्रीय युवा महोत्सवाचे रुपांतर VBYLD मध्ये करण्यात आले असून तो विकसित भारत २०४७ या दृष्टीकोनाशी जोडण्यात आला आहे. या पार्श्वभुमीवर NYK VBYLD-२०२६ चे आयोजन युवा कार्यक्रम व खेळमंत्रालयाकडून केले जाणार आहे. त्यामध्ये १५ ते २९ वयोगटातील युवकांचा सहभाग अपेक्षित आहे. यामध्ये विकसित भारत जिल्हास्तर युवा महोत्या सांस्कृतीक व नवोपक्रम मार्ग यामध्ये पुढीलप्रमाणे कला प्रकार संख्या अंतर्भूत आहेत. १) सांस्कृतिक कला प्रकार : समुह लोकनृत्य (सहभाग संख्या १०), लोकगील (सहभाग संख्या १०) कौशल्य विकासः कथालेखन (सहभाग संख्या ०३), चित्रकला (सहभाग संख्या ०२. वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी) (सहभाग संख्या ०२), कविता (५०० शब्द मर्यादा सहआग संख्या (३) असे एकूण ३० सहभाग संख्या राहील. या स्पर्धेमध्ये सहभागासाठी १५ ते २९ वयोगट राहील. दि.१२ जानेवारी रोजी व्याची परिगणना १५ ते २९ असावी) जन्म दिनांक बाबत सबळ पुरावे द्यावे लागेल.

युवा महोत्सव म्हणजे युवकांना आपले कलागुण दाखविण्याचे एक खुले व्यासपीठ आहे. यामध्ये युवकांचा सर्वांगिण विकास करणे, देशाची संस्कृती व परंपरा जतन करणे, राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे, युवकांना विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना Innovation Science and Technology महत्व पटवून देणे, शिक्षण, उद्योग व्यवसाया सोबतच शेती या व्यवसायाशी युवकाची ओळख करून देणे, सामाजिक विकासात विज्ञानाचे महत्त्व युवकाना पटवुन देणे इत्यादी बाबीवर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेमध्ये सहभागासाठी १५ ते २९ वयोगट राहील. दि. १२ जानेवारी २०२६ या दिवशी वयाबाबत परिगणना १५ ते २९ असावी जिल्ह्यातील इंजिनियरिंग कॉलेज, वैद्यकीय महविद्यालये, कृषि महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, सांस्कृतिक मंडळ तसेच १५ ते २९ वयोगटातील युवांना सदर युवा महोत्सवामध्ये सहभागासाठी पात्रता राहील. तो महाराष्ट्राचा रहिवाशी असावा, स्पर्धकांनी नाव पत्ता, जन्म दिनांक, संपर्क क्रमांक, ई मेल आयडी व वयाबाबत सबळ पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

जिल्ह्यातील कृषी महाविद्यालये, कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालये, अभियांत्रीकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महिला मंडळ, महिला बचत गट, स्वंयसेवी संस्था, नेहरू युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), इत्यादी संस्थेतील युवक व युवती यांना सहभागासाठी आमंत्रीत करण्यात आले आहे.

युवा महोत्सवामध्ये प्रत्येक कलाप्रकारासाठी विजयी स्पर्धकांना आकर्षक रोख बक्षीस, ट्रॉफीज देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विजयी युवकांना विभागस्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचा मान मिळणार आहे. नांदेड जिल्ह्यातील इच्छुक युवक व युवतींनी आपली नावे प्रवेशिका दि. २ डिसेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, स्टेडीयम परीसर, नांदेड येथे सादर करावेत. अधिक माहितीकरीता कार्यासन प्रमुख बालाजी शिरसीकर ९८५०५२२१४१, ७५१७५३६२२७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## बहुजन संघर्ष सेनेचा २४ वा वर्धापन दिन साजरा




**नांदेड (प्रतिनिधी) –** बहुजन संघर्ष सेनेच्या २४ वा वर्धापन दिन संघटनेच्या कार्यालयात संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात चिखलीकर यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना सामाजिक कार्याबाबत मार्गदर्शन केले.

संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी बहुजन संघर्ष सेनेच्या मागील २४ वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा सांगितला. तसेच २४ वर्षापासून संघटना कशा पद्धतीने समाजावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढत आहे, याची माहिती दिली.

तसेच संघटनेने वेळोवेळी उभारलेले आंदोलन हे कशा पद्धतीने यशस्वी झाले आहेत. संघटनेने घेतली प्रसंगानुरुप राजकीय भूमिका याबाबतही चिखलीकर यांनी कार्यकर्त्यांना अवगत केले.

सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या वेळेस बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे मराठवाडा उपाध्यक्ष सुखदेव चिखलीकर, सुधाकर पांढरे मित्र मंडळाचे राहुल वाघमारे, राजेश चौदंते, जयपाल चिखलीकर, अविनाश जोंधळे, मिलिंद जोंधळे, राहुल थोरात, यश बहादुरे, नितीन देडे, किरण चित्ते, शुभम जोंधळे, संतोष दुंडे, विशाल गायकवाड, रवी वाघमारे, वैभव चिखलीकर, लक्ष्मण ताटीपामुलवार, लक्की चिखलीकर उपस्थित होते.

## जालना - छपरा विशेष गाडीस मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वे ने जालना छपरा जालना विशेष गाडीला मुदत वाढ देण्याचे ठरविले आहे, ते पुढील प्रमाणे गाडी क्रमांक ०७६५१ जालना ते छपरा विशेष गाडी दिनांक ०३ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान दर बुधवारी जालना रेल्वे स्थानकावरून रात्री २३.३५ वाजता सुटेल आणि छत्रपती संभाजीनगर , मनमाड, भुसावळ, खंडवा, हरदा, इटारसी, पिपरिया, गाडरवाडा, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज चवकी , विंध्याचल , वाराणसी, औणरिहर, गाझीपूर सिटी, बलिया मार्गे छपरा येथे शुक्रवारी सकाळी ०९:५० वाजता पोहोचेल.

छपरा – जालना विशेष गाडी : गाडी क्रमांक ०७६५२ छपरा ते जालना विशेष गाडी दिनांक ०५ डिसेंबर २०२५ ते ०२ जानेवारी २०२६ दरम्यान दर शुक्रवारी छपरा रेल्वे स्थानकावरून रात्री २२.१५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गाने जालना येथे रविवारी सकाळी ०९.५० वाजता पोहोचेल.

## गीता पाठांतर स्पर्धा १ डिसेंबर रोजी होणार; १२ शाळांचे १५० विद्यार्थी सहभाग घेणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील श्री दासगणु संत भक्त मंडळ आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमद् भगवद्गीता पाठांतर स्पर्धा सोमवार दि. १ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता कुसुम सभागृह येथे होणार आहे.

श्री दासगणु संत भक्त मंडळ आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ही पाठांतर स्पर्धा गेल्या दहा वर्षापासून चालू आहे. यंदाचे हे अकरावे वर्ष आहे. दरवर्षी गीता जयंतीच्या निमित्ताने माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यासाठी ही स्पर्धा घेतली जाते.

यावर्षी सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते ७ दरम्यान कुसुम सभागृहात गीता पाठांतर स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत नांदेड शहरातील १२ शाळांचे दीडशे विद्यार्थी भाग घेणार आहेत. या शाळांमध्ये ऑक्सफोर्ड इंटरनॅशनल स्कूल, गुजराती हायस्कूल, होली सिटी, टायनी एन्जल्स, सांदिपनी पब्लीक स्कूल, प्रतिभा निकेतन, शाकुंतल स्कूल, कमला नेहरु कन्या शाळा, केंब्रिज स्कूल, राणी लक्ष्मीबाई क. शाळा, कै. नाना पालकर, प्रज्ञा निकेतन यांचा समावेश आहे.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध बालसाहित्यिक प्रा. डॉ. सुरेश सावंत हे उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ विजेत्यांना अनुक्रम ३०००, २०००, १०००/– रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह दिले जाणार आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन गौरविले जाणार आहे. या कार्यक्रमात भगवद्गीता महात्म्य चित्रफित दाखवली जाते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शंतनु कस्तुरे, संताबादास देशमुख, सौ. नीता चौधरी हे राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, उपप्राचार्य डॉ.सौ. अरूणा शुक्ला, प्राध्यापक व श्री दासगणू संत भक्त मंडळाचे सदस्य परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी फुले एक उद्योजक आंबेडकरवादी मिशन प्रबोधन अभियानाला प्रारंभ



**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा फुले यांच्या स्मृती दिनी फुले एक उद्योजक या आंबेडकरवादी मिशन तर्फे अभियानाचा प्रारंभ करण्यात आला.

या प्रसंगी बीड येथील शिक्षण, उद्योगात यशस्वी प्रा. प्रदीप रोडे, माजी अधीक्षक अभियंता मिलिंद बनसोडे, पोलीस उपाधीक्षक विजय डोंगरे, दिगंबर मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

महात्मा फुले हे शिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते होते. विधवा विवाह पुरस्कर्ते, स्त्री–पुरुष समता, शिक्षण लिखाण आदी महत्वपूर्ण कामे त्यांनी केले आहे. सोबतच ते यशस्वी उद्योजक पण होते. आज आरक्षण संपविण्यात आले आहे. अ, ब, क, ड चा घाट घालून समाजाला विभागण्यात येत आहे. सरकारी नोकरी प्रमाण आत्यंतिक कमी आहे, हे लक्षात घेत तरूणांसमोर उद्योजक बनणे हाच उपाय आहे. त्यामुळे उद्योजक समाजातूनच तयार करणे ही काळाची गरज आहे. म्हणून महात्मा फुले एक उद्योजक मानुन तरुण प्रेरणा देणे आवश्यक आहे. त्यामुळे हे अभियान वर्ष भर राबविण्यात येत असल्याचे आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी स्पष्ट केले.

## माहूरमध्ये उद्देशिकेचे वाचन करून शहिदांना श्रद्धांजली



**माहूर (प्रतिनिधी)–** २६/११ च्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या नागरिक, पोलीस आणि जवानांना माहूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक देविदास चोपडे म्हणाले, शहीद झालेले वीर आपल्या मायभूमीसाठी सर्वोच्च बलिदान देऊन गेले आहेत. या हल्ल्याच्या वेदनादायी आठवणी आजही ताज्याच आहेत. शहिदांचे बलिदान कधीही व्यर्थ जाणार नाही.

या वेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, वसंत कपाटे, पद्मा गिऱ्हे, कादर दोसानी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. विनोद कांबळे यांनी संविधानाचे वाचन केले.

कार्यक्रमास नगरसेवक विजय कामटकर, रफीक सौदागर, राजू सौंदलकर, आकाश कांबळे, निसार कुरेशी, रणधीर पाटील, इरफान शेख, सुमित खडसे, विक्रम राठोड, अफसर आली, सुमित खडसे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सरफराज दोसानी, 'पॉवर ऑफ मिडिया'चे इलियास बावानी, राज ठाकूर, जयकुमार अडकीने, सिद्धार्थ तामगाडगे, सुरेखा तळळणकर, जयंत गिऱ्हे, अमजद पठाण वाईकर, अमित येवतीकर, राजू चव्हाण, इम्रान सुरय्या, आशू पठाण, डी. डी. चव्हाण, सुनील आडे, शुभम पराते, वाजीद शेख, करीम कुरेशी, सलीम शेख, सत्तार शेख, अल्ताफ शेख, शेख अयाज, विकास राठोड यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते. दोन मिनिटे मौन पाळून शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## सिडको वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने भारतीय संविधान दिन साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाच्यावतीने संविधानातील उद्देशिकेचे वाचन व मिठाई वाटप करून संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष तिरूपती पाटील घोगरे, अनिल पाटील धमणे, भि.ना.गायकवाड, व्यंकटराव इंगळे यांच्यासह वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सतिश कदम, बालाजी सुताडे, महिला वितरक वंदना लोणे व वृत्तपत्र विक्रेते बांधवांची उपस्थिती होती.

## पीपल्स कॉलेजमध्ये उद्देशिकेचे सामुहीक वाचन



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताच्या घटना परिषदेने अथक परिश्रमांनंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला राज्यघटना अर्पण केली होती. या ऐतिहासिक घटनेला आज ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतीय संविधान गौरव दिनानिमित्त पीपल्स कॉलेज, नांदेड येथे संविधान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून झाली. त्यानंतर भारतीय राज्यघटनेचे पूजन करण्यात आले व सर्व उपस्थितांनी सामुहिकरित्या संविधान उद्देशिकेचे वाचन केले.

या निमित्ताने भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये या विषयावर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अभय दातार यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या भाषणात डॉ. दातार यांनी भारतीय राज्यघटनेतील मूलभूत तत्वे, तिची वैशिष्ट्ये तसेच इतर देशांच्या राज्यघटनांशी तुलना करत भारतीय राज्यघटनेचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रा. दातार यांनी सांगितले की, भारतीय राज्यघटना ही सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून जगातील सर्वश्रेष्ठ घटनांपैकी एक आहे.

कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य प्रा. विलास वडजे, इंग्रजी विभागातील प्रा. आनंदा थोरात, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. स्वाती काटे, प्रा. सविता महाजन, ग्रंथपाल प्रा. संदीप गायकवाड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. विजय कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान कॉलेजमध्ये संविधान दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पोखर्णी येथील महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात दि. २६ नोव्हेंबर रोजी ७६ वा संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून झाली. संविधानातील मूलभूत मूल्यांप्रती निष्ठा व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी देशभक्तीची भावना व्यक्त केली.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ए. सोनवणे यांनी संविधानाचे महत्त्व तसेच विद्यार्थ्यांनी अनुसरावयाचे कर्तव्य याबाबत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. पी. एस. कांबळे यांनी संविधान दिवस साजरा करण्यामागील इतिहास आणि उद्देश यावर प्रकाश टाकला. देशाच्या लोकशाही मूल्यांना बळकट करण्याचा संकल्प सर्वांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमास प्रा. के. आर. उदासी, प्रा. डी. एस. एंगडे, श्री. जि. एस. कदम, श्री. एस. एस. जाधव, श्री. आर. एन. मोरे यांच्यासह महाविद्यालयातील इतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## 'मायेची ऊब' अंतर्गत निराधारांना २५० ऊबदार ब्लँकेटचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)–** रस्त्यावर कुडकुडत झोपणाऱ्या निराधारांना आधार देण्यासाठी संयोजक ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून 'मायेची ऊब' अंतर्गत ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. नांदेडभूषण संतबाबा बलविंदरसिंघजी, भाजपा महानगराध्यक्ष अमर राजूरकर, लायन्स उपप्रांतपाल राहुल औसेकर आणि योगेश जायस्वाल यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. आगामी चाळीस दिवस दररोज मध्यरात्री नांदेड शहरातील विविध रस्त्यावर फिरून गरजूंना ब्लँकेटचे वितरण केले जाणार आहे

भाजपा महानगर नांदेड, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल, अमरनाथ यात्री संघ व सन्मित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नगीनाघाट येथे रथपूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संयोजक ॲड. दिलीप ठाकूर यांनी प्रास्ताविकातून या उपक्रमामागची सामाजिक प्रेरणा स्पष्ट केली. संतबाबा बलविंदरसिंघजी यांनी आपल्या मनोगतात, दिलीप ठाकूर हे सातत्याने निरपेक्ष भावनेने समाजातील वंचितांसाठी कार्य करतात, अशा शब्दांत कौतुक केले.

राजेशसिंह ठाकूर यांनी सांगितले की, यावर्षीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणखी ८८६ ब्लँकेटची आवश्यकता आहे. दानशूर नागरिकांनी सढळ हाताने मदत करावी, असे त्यांनी आवाहन केले.




पहिल्या दिवशी दोन सत्रात अडीचशे गरजूंना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी सुरेश लोट, अरुण काबरा, सुरेश शर्मा, जयश्री ठाकूर, सविता काबरा यांनी मोत्याची माळ अर्पण करून मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवा लोट यांनी तर आभार सुरेश निल्लावार यांनी मानले.

प्रमोद हिबारे, ड. दिलीप ठाकूर, रूपेश वट्टमवार, सीतारामजी जाजु, अशोक पडगीलवार, स्नेहलता जायस्वाल, अशोक गंजेवार, शशिकांत देशपांडे, अंकीता मुत्तेपवार, डॉ. राजेंद्र मुंदडा, मोहित व रेणुका सोनी, प्रा. प्रभाकर उदगीरे, सतीश सुगनचंदजी शर्मा, डी.एच. अग्रवाल, नारायण गायकवाड , अज्ञात दाता, अविनाश चिंतावार, अबिरा गौरी राहुल पवार, साईनाथ पदमवार, संजय खुपसे, कैलाश झंवर, सौ. गयाबाई कदम, सोनाली वारले, शिवराज विंचूरकर, विश्वेश्वर नांदेडकर, तिरुपती कल्याण, सुधाकर जबडे, प्रा. एस.एस. झंपलवाड, हरिसिंह चव्हाण, डॉ. भगवान केंद्रे, सौ. अलका मिलिंद पेकमवार, प्राचार्य सुधीर शिवणीकर यांनी ब्लँकेटसाठी देणगी दिली आहे.

या उपक्रमासाठी सुरेश शर्मा, जगतसिंह ठाकूर, कामाजी सरोदे, संतोष भारती, दिगंबर रूमने, रोहन यादव, भोला धुमाळ, जनार्धन वाकोडीकर,अंकित शर्मा, कपिल यादव, कैलास बरंडवाल, दत्ता पाटील, संगिता यादव यांनी परिश्रम घेतले.

# चंदेरी

## रश्मिका मंदाना-आयुष्मान खुरानाचा 'थामा' पहा घरबसल्या



'थामा' हा वर्षातील बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक होता. दिवाळीच्या मुहूर्तावर, म्हणजे २१ ऑक्टोबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. आयुष्मान खुराना आणि रश्मिका मंदाना ही जोडी मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्सच्या या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. आदित्य सरपोतदार यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट सरदार बॉक्स ऑफिसवर यशस्वी झाला. आता थामा ओटीटीवर रिलीज होण्यास सज्ज झाला आहे. तुम्ही 'थामा' थिएटरमध्ये पाहिला नसेल तर तो घरबसल्या पाहू शकता. निर्माते आता तो ओटीटीवर रिलीज करण्याची तयारी करत आहे. 'थामा' प्राइम व्हिडीओवर २ डिसेंबरला रिलीज होणार आहे. पण अद्याप निर्मात्यांनी यासंदर्भात अधिकृत घोषणा केलेली नाही. 'थामा'ने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. सॅकनिल्कच्या आकडेवारीनुसार, थामाने भारतात १३४ कोटी आणि जगभरात १८७.५१ कोटी रुपये कमावले. यात आयुष्मान खुरानाने आलोक नावाच्या पत्रकाराची भूमिका केली आहे. आलोकच्या आयुष्यात एक मोठा ट्विस्ट येतो आणि तो ताडकाच्या प्रेमात पडतो. ताडकाच्या भूमिकेत रश्मिका मंदाना आहे. रश्मिका एक व्हॅम्पायर असते. पुढे ताडका व आलोकच्या आयुष्यात अनेक रंजक गोष्टी घडतात, त्या चित्रपटात पाहायला मिळतात. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'थामा'मध्ये आयुष्मान खुराना व रश्मिका मंदाना, नवाजुद्दीन सिद्दीकी, परेश रावल यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. यात वरुण धवनचाही कॅमिओ आहे.

## 'स्पिरिट'मध्ये रणबीर कपूरचीही असणार विशेष भूमिका

**दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगांचा 'स्पिरिट' सिनेमा सध्या प्रचंड चर्चेत आहे. प्रभास आणि तृप्ती डिमरी यांची मुख्य भूमिका असलेल्या 'स्पिरिट'च्या शूटिंगला नुकतीच सुरुवात झाली आहे. यात आधी दीपिका पादुकोण ही मुख्य अभिनेत्री असणार होती, पण कामाचे तास आणि काही अटींवरून मतभेद निर्माण झाल्यानं तिनं या सिनेमातून एक्झिट घेतली आणि तृप्ती डिमरीची एन्ट्री झाली. अशातच आता बॉलीवूड अभिनेता रणबीर कपूरचीही या सिनेमात एन्ट्री झाल्याचं म्हटलं जात आहे.**



संदीप रेड्डी वांगाबरोबर २०२३ मध्ये 'ॲनिमल'सारखा ब्लॉकबस्टर सिनेमा केल्यानंतर आता रणबीर पुन्हा 'स्पिरिट'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. काही वृत्तांनुसार, रणबीरला 'स्पिरिट'मध्ये एक कॅमियो रोल ऑफर करण्यात आला असल्याचं म्हटलं जात आहे. प्रभासच्या या आगामी 'स्पिरिट' सिनेमाची सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे. हा एक कॉप ॲक्शन थ्रिलर सिनेमा असल्याचं म्हटलं जातंय. याच महिन्यात चित्रपटाचं शूट सुरू झालं आहे. रणबीर कपूरची एन्ट्री ही सिनेमासाठी खास असेल, कारण तो आणि प्रभास पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. दरम्यान, 'स्पिरिट' सिनेमात प्रभास आणि तृप्तीबरोबर विवेक ओबेरॉय, प्रकाश राज हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. रणबीर कपूरच्या आगामी कामाबाबत सांगायचं झालं तर ऑगस्ट २०२६ मध्ये तो संजय लीला भन्साळी यांच्या 'लव्ह अँड वॉर'मध्ये पत्नी आलिया भट्ट आणि विक्की कौशलसह दिसेल. त्यानंतर तो बहुप्रतीक्षित 'रामायण'मध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे.



# सुरक्षित राहणे प्रत्येक मुलीचा जन्मसिद्ध हक्क!

**नाटक असो, जाहिराती असो, चित्रपट असो किंवा ओटीटी प्लॅटफॉर्म असो, निमरत कौरने सर्वत्र स्वतःला सिद्ध केले आहे. 'द लंचबॉक्स' सारख्या चित्रपटांनी मन जिंकणारी ही अभिनेत्री 'एअरलिफ्ट' आणि 'दसवी' सारख्या चित्रपटांमध्येही दिसली आहे. 'कुल' या वेब सिरीजमधील भूमिकेसाठी नुकतीच प्रशंसा मिळालेली निमरत सध्या तिच्या नवीन वेब सिरीज 'द फॅमिली मॅन'च्या सीझन ३ मधील नकारात्मक भूमिकेसाठी चर्चेत आहे. तिची एक खास मुलाखत...**



विशेष मुलाखत
निमरत कौर

» **प्रश्न : तू आतापर्यंत पडद्यावर सशक्त महिला पात्रे साकारली आहेत, पण वास्तविक जीवनात मुलींबद्दल तुला सर्वात जास्त कोणती चिंता वाटते?**

**निमरत :** मुली म्हटलं की आपोआपच असुरक्षितता निर्माण होते. ती फक्त ऑफिस किंवा कामाच्या ठिकाणीच नाही, तर रस्त्यावर, प्रवासात सर्वत्र ती जाणवते. मी दिल्लीत वाढले आणि जेव्हा मी मुंबईत आले तेव्हा मला पहिल्यांदाच समजले की आपण पूर्णपणे सुरक्षित नाही. जग असे का असावे की सुरक्षेच्या दृष्टीने मुलगी असणे नुकसानकारक वाटावे ? काम, समर्पण, कठोर परिश्रम आम्हीही तितकेच करतो, जितके कोणताही पुरुष करतो. मग आम्हीच स्वतःला आधी सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न का करावा? हे चांगले आहे, इथे अधिक सुरक्षितता आहे, असेच एखाद्या मुलीला का वाटावे? सुरक्षितता ही काही सुविधा नाही. तो आमचा अधिकार आहे. सुरक्षित राहणे हा प्रत्येक मुलीचा जन्मसिद्ध हक्क आणि मूलभूत अधिकार आहे. यावर प्रश्नचिन्हच उपस्थित राहता कामा नये.

» **प्रश्न : मुलगी आहेस म्हणून तुला कधी, कुठे कमीपणाची वागणूक देण्यात आली का?**

**निमरत :** मी भाग्यवान आहे की मी अशा ठिकाणी लहानाची मोठी झाले, जिथे मला कधीच ही जाणीव झाली नाही. मला कधीही असे सांगण्यात आले नाही की मी मुलगी आहे म्हणून मी हे किंवा ते करू शकत नाही. माझ्यावर कधीही कोणताही निर्णय लादण्यात आला नाही. मी या बाबतीत स्वतःला खूप नशीबवान समजते. मला असं वाटतं, की मुलींनीही त्यांच्या वुमनकार्डचा वापर करू नये. कधीकधी तुम्हाला मुलगी असल्याचा फायदा घ्यायचा असतो आणि नंतर कधीकधी तुम्ही अशी तक्रारदेखील करता की मी मुलगी आहे, याचा अर्थ असा नाही की मी हे करू शकत नाही... एक मुलगी म्हणून, तुम्ही दुहेरी मानके ठेवू नयेत. प्रामाणिकपणा ठेवावा. तुमचे काम तुम्हाला पुढे घेऊन जाऊ द्या, तुमचे स्त्रित्व नाही.

» **प्रश्न : एक अभिनेत्री म्हणून तुझ्यासाठी भूमिका लिहिल्या जातात आणि तुझ्या शो किंवा चित्रपटांचे मोठे होर्डिंग्ज शहरभर लावलेले दिसतात. तुला तुझ्या कारकिर्दीतील पहिले पोस्टर आठवते का?**

**निमरत :** मला आठवते. ते 'द लंचबॉक्स'चे होते. मुंबईतील जुहू सर्कलवर नेहमीच मोठे होर्डिंग्ज दिसतात आणि कोणीतरी मला सांगितले की तिथे तुझ्या चित्रपटाचे एक मोठे पोस्टर लावलेले आहे. त्यावेळी तुम्ही माझ्या उत्साहाची कल्पना करू शकत नाही. मी विचार करत राहिले, की अरे माझे इतके मोठे पोस्टर! आणि मी ते स्वतः पाहण्यासाठी गेले होते. पण जेव्हा मी ते होर्डिंग पाहिले... तेव्हा मी उलटी दिसत होते... इरफान पत्र वाचत आणि खाताना दिसला आणि माझा फोटो उलटा लटकत होता... मला हसावे की रडावे हे कळत नव्हते. पण काही दिवसांनी जणू काही नशिबाने मला मिठी मारली. मी एका प्रसिद्ध बटर जाहिरातीत मुख्य कलाकार होते आणि ते पोस्टर अगदी द लंचबॉक्ससारखे होते. जेव्हा मी स्वतःला त्या नवीन पोस्टरमध्ये परिपूर्णपणे सजलेले पाहिले तेव्हा मला खूप समाधान वाटले. पहिल्या पोस्टरच्या 'उलट्या आठवणीला' गोड प्रतिसाद मिळाल्यासारखे वाटले.


» **प्रश्न : आज एकीकडे तुम्ही करत असलेल्या शोसारखे दीर्घ स्वरूपाचे कंटेंट आहे (प्रत्येकी एक तासाचे ७-८ भाग) आणि दुसरीकडे, २-३ मिनिटांच्या मायक्रोड्रामाच्या स्वरूपात उभ्या शोचा ट्रेंड आहे. तुला याबद्दल काय वाटतं?**

**निमरत :** मी तुम्हाला सांगते, मी अनेक वर्षांपासून जाहिरातींमध्ये काम केले आहे आणि त्यामध्ये तुम्ही २०-३० सेकंदात उत्पादन विकता आणि निघून जाता. माझा विश्वास आहे की ते लांब स्वरूपाचे असो किंवा मायक्रोड्रामा फक्त ते आकर्षक असले पाहिजे.

» **प्रश्न : निमरत आजकाल तुझा कल गुंतागुंतीच्या किंवा नकारात्मक पात्रांकडे जास्त दिसतो का? 'दसवी' चित्रपटानंतर, तू 'कुल' या वेब सिरीजमध्ये देखील तशाच भूमिकेत दिसत आहेस...**

**निमरत :** कलाकाराच्या आयुष्यात असे अनेकदा होते, की त्याला वेगवेगळ्या भूमिका साकारायच्या असतात. बरेचदा पात्रेच त्याला निवडतात. या मालिकेत नवीन एन्ट्री म्हणून नकारात्मक भूमिका मिळाल्याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजते. यापूर्वी, मी 'दसवी' आणि 'कुल' सारख्या मालिकांमध्ये गुंतागुंतीची पात्रे साकारली आहेत. मी तुम्हाला एक मनोरंजक गोष्ट सांगतेः मी माझ्या कारकिर्दीच्या सुरुवातीला हॉलिवूड मालिका 'होमलँड'मध्ये देखील नकारात्मक भूमिका साकारली होती. एखादे पात्र सकारात्मक असो वा नकारात्मक, ते साकारणे आनंददायी असेल तर तो एक वेगळा अनुभव असतो. अर्थात, तुम्ही तुमच्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग त्या भूमिकेसाठी समर्पित करत आहात. मी २०१३ मध्ये 'द लंचबॉक्स' आणि २०१९ मध्ये 'होमलँड' चित्रपट केला होता. एका कलाकाराला त्याची भूमिका उत्कटतेने करावी लागते, परंतु जेव्हा तुमचे सह-कलाकार अद्भूत असतात तेव्हा भूमिका साकारण्याचा आनंद वाढतो. आता, या मालिकेत, मला ११० चित्रपटांमध्ये काम केलेल्या मनोज बाजपेयींसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्याच्यासोबत काम करताना, अभिनय क्षेत्रात इतका वेळ घालवल्यानंतरही, भूमिकांबद्दलचा त्याचा दृष्टिकोन किती उत्साही आहे याबद्दल मला बरेच काही शिकायला मिळाले. जणू काही तो नुकताच त्याच्या कारकिर्दीला सुरुवात करत आहे असे वाटते.

# ओटीटीमुळे मिळत आहे कठोर परिश्रमाचे फळ : भुवन अरोरा



**भुवन अरोराने अभिनयाच्या जगात प्रवेश केला तेव्हा त्याच्याकडे लहान पण प्रभावी भूमिका होत्या. त्याने प्रत्येक पात्रात जीव ओतून काम केले. तो सतत स्वतःमध्ये सुधारणा घडवत गेला. भुवनला माहीत आहे, की कलाकाराची खरी ताकद पात्राला जिवंत करून पडद्यावर साकारण्यात असते. अलीकडेच, लखनऊला भेट दिलेल्या भुवनने त्याच्या आयुष्यातील आणि कारकिर्दीतील न समोर आलेल्या गोष्टींना उजाळा दिला... शुद्ध देसी रोमान्स, नाम शबाना, चंदू चॅम्पियनसारख्या चित्रपटांमध्ये आणि फर्जी, दुपहिया आणि जानवर - द बीस्ट विदिनसारख्या टीव्ही शोमध्ये दिसणारा भुवन म्हणतो, की कलाकाराने कधीही त्यांच्या कामावर समाधानी राहू नये...**

### अस्वस्थता कलाकाराला जिवंत ठेवते...

मला आजपर्यंत माझे कोणतेही काम पसंत आलेले नाही. मला असं वाटतं, की ज्या दिवशी एखादा कलाकार स्वतःच्या कामावर खुश होईल, तो त्याचा शेवटचा दिवस असेल. मी फक्त स्वतःचे सर्वोत्तम योगदान देण्याचा विचार करत असतो. सुधारण्यासाठी आपल्याला नेहमीच जागा असते. कधीकधी दहा वर्षांपूर्वीचे काम देखील स्वप्नात येते आणि मला असे वाटते की ते थोडे वेगळे करता आले असते. जावेद अख्तर यांनी लिहिले आहे ना 'जोपर्यंत तुम्ही तुमच्या हृदयात अस्वस्थता घेऊन जगता तोपर्यंत तुम्ही जिवंत आहात.' अगदी तसेच.

### OTT ने कलाकारांना दिली नवीन ओळख

OTT ने आमच्यासारख्या कलाकारांसाठी केवळ दरवाजेच नाही तर किल्ले आणि बुरुज उघडले आहेत. जर हे व्यासपीठ नसते तर मुंबईतील सुमारे ६०% कलाकारांच्या करिअरला खूप वेगळी दिशा मिळाली असती. कोविडच्या कठीण काळात ओटीटीने लोकांचे मनोरंजन करण्याची जबाबदारी घेतली आणि माझ्यासारख्या अनेक कलाकारांना उदयास येण्याची संधी दिली. जेव्हा आपण सर्वात कठीण काळातून जात होतो, तेव्हा कला ही एकमेव गोष्ट होती जी आपले मन शांत ठेवते. खरे सांगायचे तर, ओटीटी नसते तर अनेक गोष्टी शक्य झाल्या नसत्या.

### कोणताही अभिनेता कथेच्या किंवा पटकथेच्या वर नाही...

माझ्या अनेक पात्रांमध्ये कॉमिक टायमिंगसह भावनिक खोलीसुद्धा आहे. प्रत्यक्षात हे सर्व लेखन पातळीवर निश्चित केले जाते, कारण कोणताही अभिनेता कथेच्या किंवा पटकथेच्या वर जाऊ शकत नाही. बॅलन्स नेहमीच लेखनातून येते. जेव्हा तुम्हाला एक चांगले लिहिलेले आणि प्रामाणिक पात्र दिले जाते तेव्हाच एक अभिनेता किंवा अभिनेत्री काहीतरी नवीन निर्माण करू शकते. मी जादूगार नाहीये, मी फक्त एक माणूस आहे जो माझे अनुभव पात्रांशी जोडून त्यांना जिवंत करतो.

### सर्व कष्ट कौतुकासाठी...

जेव्हा लोक मला ओळखू लागतात तेव्हा खूप छान वाटते. मला असे वाटते की इतक्या वर्षांच्या कष्टाचे फळ आता मिळत आहे. लोक मला जे प्रेम देतात ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा कमी नाही. मी खूप अंतर्मुख होतो. मला समाजात राहायला आवडते. खरं तर, माझ्या अभिनयाची सर्वात मोठी ताकद म्हणजे मी लोकांशी बोलतो, त्यांना समजून घेतो आणि त्यांच्याकडून शिकतो. मग मी ते गुण माझ्या कामात समाविष्ट करतो. जेव्हा कोणी येऊन सांगते की त्यांना माझे काम आवडले, तेव्हा असे वाटते की ही सर्व मेहनत, चिंता आणि त्रास या कौतुकासाठीच होती.

### काम तुमची वाट पाहत आहे...

मी २०१३ मध्ये इंडस्ट्रीमध्ये प्रवेश केला. सुरुवातीला माझ्या भूमिका लहान होत्या, पण प्रभावी होत्या. हळूहळू, मला प्रेक्षकांकडून कौतुक आणि प्रेम मिळू लागले आणि मला वाटू लागले की मी योग्य मार्गावर आहे. दिल्लीत राहणारा माझा एक मित्र नेहमी म्हणायचा, 'कधीही असे समजू नको की तू कामाची वाट पाहत आहात; नेहमी अस विचार कर की काम तुझी वाट पाहत आहे. तुला फक्त पुढे जात राहावे लागेल. हा विचार खूप उपयुक्त ठरला. मी लहान भूमिका करत राहिलो, परंतु त्यांच्या प्रभावामुळे मला खात्री पटली की मी योग्य मार्गावर आहे आणि एक दिवस माझे ध्येय गाठेन.

### बहीण लखनौमध्ये जन्मली...

माझे वडील सैन्यात होते आणि लखनौमध्ये बदली झाली होती. त्यामुळे माझ्या बहिणीचा जन्म लखनौच्या आर्मी हॉस्पिटलमध्ये झाला. याव्यतिरिक्त मी येथे एका वेब सिरीजच्या शूटिंगसाठी देखील आलो आहे, ज्याचे वर्किंग टायटल 'तत्काल' होते. माझ्या कुटुंबासोबत भेट देण्याचा अनुभवही खूप छान होता. मला वाटतं, ही एक अद्भुत जागा आहे. इथले लोकही तितकेच अद्भुत आहेत आणि जेवण आणखी छान आहे. लखनौच्या या आठवणी आणि अनुभव माझ्यासाठी नेहमीच खास राहतील.

# ‘वनतारा’च्या उद्दिष्टांचे जागतिक स्तरावर पुनरुज्जीवन; सीआयटीईएसच्या बैठकीत भारताच्या भूमिकेला मान्यता



**जामनगर (वृत्तसंस्था)–** उझबेकिस्तानमधील समरकंद येथे नुकतेच पार पडलेल्या ‘सीआयटीईएस’च्या (साईट्स) २०व्या परिषदेच्या बैठकीत स्थायी समिती आणि सदस्य राष्ट्रांनी प्रचंड बहुमताने भारताच्या भूमिकेला ठाम मान्यता दिली. प्राण्यांच्या आयातीसंदर्भात भारताविरोधात कोणतीही कारवाई करण्यासारखे पुरावे किंवा कारणे नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या निष्कर्षामुळे वनताराच्या कायदेशीर, पारदर्शक आणि विज्ञानाधिष्ठित वन्यजीव संवर्धन मॉडेलची ठोस पुष्टी झाली असून, जागतिक नियमांचे पालन करणारे आणि नैतिकदृष्ट्या सर्वाधिक सुशासित असे वन्यजीव संवर्धन केंद्र म्हणून वनताराची प्रतिष्ठा अधोरेखित झाली. जागतिक वन्यजीव नियमपालनाचे मूल्यमापन करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांशी संबंधितसचिवालयाने सप्टेंबर २०२५ मध्ये वनताराची दोन दिवस तपासणी केली. या भेटीत त्यांनी वनतारातील प्राणीसाखळी, पशुवैद्यकीय व्यवस्था, नोंदी, बचावकार्य आणि कल्याण प्रक्रियेची सखोल छाननी केली.

३० सप्टेंबर २०२५ रोजी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अहवालात सचिवालयाने वनताराला अत्याधुनिक पायाभूत सुविधा, प्रगत पशुवैद्यकीय सेवा आणि सक्षम बचाव-पुनर्वसन प्रणाली असलेले, जगातील सर्वोत्तम कल्याणकेंद्रित संस्थांपैकी एक म्हणून मान्यता दिली. त्यांनी स्पष्टपणे नोंदवले की, वनताराचे कार्य प्राणीकल्याण आणि संवर्धनावर आधारित आहे आणि ही संस्था कोणत्याही प्रकारच्या व्यावसायिक प्राणी व्यापारात सहभागी नाही. वनताराचे खुलेपण, सहकार्य व संबंधित प्रक्रियांशी सुसंगतता यांचाही त्यांनी उल्लेख केला.

रविवारी स्थायी समितीतील चर्चेत सदस्य देशांच्या प्रचंड बहुमताने भारताच्या भूमिकेला दिलेले समर्थन हे वनताराच्या प्रामाणिकपणाचे व उद्दिष्टांचे जागतिक स्तरावर पुनरुज्जीवन आहे. यामुळे चुकीच्या समजुती दूर होऊन जनमतात पसरलेल्या अपूर्ण किंवा दिशाभूल करणाऱ्या कथनांना वस्तुनिष्ठ आधार मिळाला आहे. वनतारा संवर्धन, नियमपालन आणि प्राणीसेवा या तिन्ही क्षेत्रांत योग्य पद्धतीने कार्यरत आहे.

पक्षकारांचा हा व्यापक पाठिंबा भारताच्या अंमलबजावणी चौकटीवरील विश्वास दृढ करणारा आहे, तसेच स्थापना दिनापासून वनताराने या मानकांचे सातत्याने पालन केल्याची आंतरराष्ट्रीय मान्यताही मिळाली आहे. जागतिक संवर्धन क्षेत्रातील वनताराच्या योगदानाचे हे एक प्रभावी प्रमाणपत्र आहे.

हे आंतरराष्ट्रीय निष्कर्ष भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) निष्कर्षांची पूर्णपणे जुळणारे आढळून येतात. एसआयटीने वनताराविरुद्धच्या सर्व आरोपांची कायदेशीर, आर्थिक, कल्याणविषयक तसेच साईट्ससंदर्भात सखोल चौकशी केली.

# सायबर घोटाळे रोखण्यासाठी दूरसंचार विभागाकडून सायबर सुरक्षा कायदा २०२४ लागू




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** डिपार्टमेंट ऑफ टेलिकॉम विभागाकडून कायद्यामध्ये महत्वाचे बदल सादर केले आहेत. यापूर्वी दूरसंचार विभागाने अस्तित्वात असलेल्या कायद्यात आवश्यक बदल केले गेले होते ज्यामुळे सायबर सुरक्षा कायदा मजबूत होईल. परंतु ते नवीन बदलाचे पुन्हा नोटिफिकेशन काढल्याने संभ्रमाचे वातावरण कायम होते. नव्या बदलासहित सायबर सुरक्षा कायदा २०२४ लागू झाल्याचे स्पष्टीकरण विभागाने दिले आहे. या निमित्ताने ग्राहकांची सायबर घोटाळ्यात अडकण्याची शक्यता दुर्मिळ होणार आहे. यावेळी विभाग सायबर सुरक्षेसाठी महत्वाची नियमावली घेऊन आली आहे. या सुधारित कायद्यानुसार बँकिंग, ई-कॉमर्स, प्रशासन आणि इतर डिजिटल सेवांमध्ये दूरसंचार ओळखपत्रांच्या व्यापक वापरामुळे उद्भवणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी नवीन उपाययोजना सादर केल्या जाणार आहेत.

दूरसंचार-सक्षम फसवणुकींपासून संरक्षण वाढेल अशा उपकरणांची ट्रेसेबिलिटी सुनिश्चित होईल असे विभागाने आपल्या नोटिफिकेशनमध्ये म्हटले आहे. यानुसार नव्या नियमात डिजिटल ओळख पडताळणी अत्यंत कडक होऊन सर्व क्षेत्रांमध्ये दूरसंचार ओळखपत्रे वापरणाऱ्या संस्थांची जबाबदारी वाढणार आहे.

या दुरुस्तीचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मोबाइल नंबर व्हॅलिडेशन प्लॅटफॉर्मचे संस्थात्मकीकरण समावेश आहे. ही नियमावली सेवा प्रदात्यांना विकेंद्रित आणि गोपनीयता-अनुपालन यंत्रणेद्वारे, डिजिटल सेवेशी जोडलेला मोबाइल नंबर खरोखरच दावा केलेल्या युजरचा आहे का नाही हे पडताळण्यासाठी ही यंत्रणा अनुमती देते. या उपक्रमामुळे म्यूल अकाउंट्सला आणि ओळखीत फसवणूक करत असलेल्या घोटाळेबाजांपासून सायबर सिक्युरिटी वाढणार आहे व या घटनांना मोठ्या प्रमाणात आळा बसेल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त केली जात आहे.

कायदेशीर उपकरणांमध्ये व्यवहार करणाऱ्या सर्व संस्थांसाठी आरडीएस प्रक्रिया सादर करतात. या केंद्रीकृत काळ्या यादीत आयएमईआय क्रमांक तपासण्याची आवश्यकता निर्माण करून सरकार ग्राहकांना चोरीला गेलेले क्लोन केलेले किंवा काळ्या यादीत टाकलेले उपकरण नकळत खरेदी करण्यापासून संरक्षण देण्याचे आणि बेकायदेशीर उपकरणे ट्रॅक करण्यात कायद्याच्या अंमलबजावणी करणे विभागाला शक्य होणार आहे.

# नियामक रचनेत फेरफार करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाने आरोग्य अधिकाऱ्यांना दिली लाच!

## ईडीच्या छापेमारीत प्रकरण आले उजेडात



**मुंबई (प्रतिनिधी)–** विशिष्ट अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयातील अधिकाऱ्यांना तसेच, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या अधिकाऱ्यांना लाच दिल्याप्रकरणी महाराष्ट्रासह दहा राज्यांतील वैद्यकीय महाविद्यालयांवर ईडीने गुरुवारी (२७ नोव्हेंबर) छापे टाकले. लाचखोरी व नियामक रचनेत फेरफार केल्याचा आरोप संबंधित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनावर करण्यात आला आहे. पीएमएलए (आर्थिक गैरव्यवहार नियंत्रण कायदा) अंतर्गत ही कारवाई झाली.

सीबीआयने ३० जून रोजी दाखल केलेल्या एका एफआयआरच्या आधारे ईडीने हे प्रकरण हाती घेतले आहे. संबंधित महाविद्यालयात झालेल्या सरकारी परीक्षणासंबंधीची गोपनीय माहिती महाविद्यालय प्रशासनातील प्रमुख व्यक्तींना तसेच, काही मध्यस्थांना पुरवण्याच्या बदल्यात सरकारी अधिकाऱ्यांना ही लाच देण्यात आली. या माहितीमुळे या महाविद्यालयांना नियामक मानदंडात फेरफार करण्यात व विशिष्ट अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगी मिळण्यात मदत झाली असल्याचा ईडीचा आरोप आहे.

# टीईटी पेपरफुटीचे धागेदोरे बिहारपर्यंत! २२ आरोपी अटकेत, प्राध्यापकांचाही सहभाग

## शिक्षण परिषदेकडून माहिती देण्यास नकार



**कोल्हापूर:** शिक्षक पात्रता अर्थात टीईटी पेपर फोडण्याच्या प्रकरणातील आरोपींची संख्या वाढतच आहे. यामध्ये मोठी टोळी असल्याचे पुढे येत आहेत. पेपर पुरविणारा संशयित आरोपी बाहेरच्या राज्यातील असल्याने अटकेसाठी पोलिस प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत या प्रकरणात २२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. दरम्यान, चौकशीला गेलेल्या तपास पथकाला परीक्षा परिषदेने गोपनीय माहिती देण्यास नकार दिल्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा कारभार पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

टीईटी परीक्षेचा पेपर फोडण्याच्या तयारीतील टोळीला पोलिसांनी अटक केली. यामध्ये शिक्षक, प्राध्यापकांचाही समावेश आहे. या प्राध्यापकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर तशी कारवाई करण्याचे संकेत शिक्षण सहसंचालक प्रकाश बच्छाव यांनी दिले आहेत. जे तीन प्राध्यापक या प्रकरणात सापडले आहेत, ते सर्व सेट उत्तीर्ण आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबत संशय अधिक बळावला आहे. यामुळे सेट परीक्षेबाबतही काही नवीन वादग्रस्त माहिती पुढे येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकाऱ्यांनीही संबंधित शिक्षकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या प्रकरणातील आरोपींची संख्या वाढत आहे. त्यांना अटक करण्यासाठी कराड, पुणे; तसेच बिहारला पोलिस पथके रवाना झाली आहेत. आतापर्यंत दोन कार, १९ मोबाइल व २५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान, टीईटीची प्रश्नपत्रिका पुरवणारा रितेशकुमार आणि कराड तालुक्यातील गायकवाड बंधू यांची २० नोव्हेंबरला पुण्यातील एका हॉटेलमध्ये भेट झाली होती. रितेशकुमारसोबत आणखी पाच जण होते. त्या सर्वांची माहिती पोलिसांना मिळाली आहे. लवकरच त्यांच्यावर अटकेची कारवाई होईल, अशी माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली.


## Change in Name

My Old Name is DATTATRAYA SHESHARAO INGLE which now I am changing as New Name DATTATRAY SHESHERAO INGALE Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address: SAMARTH NIWAS SANKET NAGAR BHAVSAR CHOWK NANDED-7502637777

## टी. सी. हरवली

माझी भरत तेजेराव पाटील या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. देगलूर ते नांदेड दरम्यान बसने प्रवास करीत असताना हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर कळवावे. संपर्क पत्ता- भरत तेजेराव पाटील नाथ नगर, भक्तापूर रोड, देगलूर.

## टी. सी. हरवली

माझी गोविंद निवृत्ती केंद्रे या नावाची १२ वी कला पास टी. सी. व मूळ कागदपत्रे कंधार ते नांदेड दरम्यान बस प्रवासात हरवली आहेत. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. संपर्क मो. ९९७५१६२२३४


# मुंबई-ठाण्यात ९ मेट्रो प्रकल्पांना गती! राज्य सरकारकडून ५०० कोटींचे बिनव्याजी कर्ज



**ठाणे:** ठाणे ते मुंबई दरम्यानच्या मेट्रो प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. एमएमआरडीएला मुंबईठाणे परिसरातील ९ मेट्रो प्रकल्पांसाठी तब्बल ५०० कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज वितरित करण्यात आले आहे. या निधीमुळे संबंधित प्रकल्पांना चालना मिळून कामे अधिक वेगाने पूर्ण होण्याची शक्यता आहे. अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंटने हे कर्ज दहिसर, मीरा रोड, ठाणे, कल्याण इत्यादी मार्गांवरील प्रकल्पांसाठी मंजूर केले असून, हे कर्ज ५० टक्के केंद्र सरकारच्या करांसाठी आणि १०० टक्के स्थानिक कर व जमिनीच्या किमतींसाठी देण्यात आले आहे.

एमएमआरडीएला मिळालेल्या या कर्जातून विविध प्रकल्पांसाठी निधी वर्ग करण्यात आला आहे. मुंबई मेट्रो लाईन ५, जी ठाणेमुंबईभिवंडी या मार्गावर धावणार आहे, तिच्यासाठी ५२ कोटी ३८ लाख ६० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या मार्गिकेमुळे ठाणे शहर व जिल्ह्यातील नागरिकांना मोठी सोय होणार असून वाहतूक कोंडीपासूनही सुटका मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय या मार्गाने ठाणेकरांना मुंबईतील इतर मेट्रो मार्गांशी उत्तम जोडणी मिळणार आहे.

इतर प्रकल्पांसाठीही महत्त्वाचा निधी अदा करण्यात आला आहे. मुंबई मेट्रो लाईन ६ (स्वामी समर्थ नगरजोगेश्वरीविखरोळी) साठी ३२ कोटी ९५ लाख २० हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत. मुंबई मेट्रो लाईन २, जी दहिसर पूर्व ते डीएन नगर जोडते, तिच्यासाठी २८ कोटी ८९ लाख ७० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. मुंबई मेट्रो लाईन २इ (DN नगरमांडले) प्रकल्पासाठी ११२ कोटी ८० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

## धोनीच्या घरी टीम इंडियाची पार्टी; गौतम गंभीरची गैरहजेरी

**रांची (वृत्तसंस्था)–**दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टेस्ट सीरिजमध्ये झालेल्या २-० अशा पराभवानंतर भारतीय संघ आता वनडे सामन्यांसाठी रांचीमध्ये दाखल झाला आहे. रांचीत ३० नोव्हेंबरला होणाऱ्या पहिल्या वनडेपूर्वी टीम इंडिया हॉटेलवर पोहोचली असली, तरी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर मात्र अद्याप आलेला नाही. गंभीर अनुपस्थित असतानाच भारतीय खेळाडू माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीच्या फार्महाऊसला भेट देण्यासाठी गेले.

रांचीमध्ये धोनीच्या फार्महाऊसवर भारतीय खेळाडूंसाठी खास पार्टीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीसह बहुतेक वरिष्ठ खेळाडूंनी धोनीची भेट घेतली असून टीमचा कोच गंभीर मात्र या वेळी गैरहजर होता.


## कॅन्टीन चालक पाहिजे

ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णुपूरी, नांदेड संस्थेत साऊथ इंडियन कॅन्टीन चालविण्यासाठी देणे आहे.

इच्छुकांनी शुक्रवार, दिनांक 5 डिसेंबर 2025 पर्यंत संपर्क साधावा.

संपर्क: श्री प्रकाश पवार मो. 9403962191

## बोरबन मध्ये दवाखाना किरायाने देणे आहे.

पहिला मजला - २२४६ चौ.फुट दुसरा मजला - २२४६ चौ.फुट

तिसरा मजला - २२४६ चौ.फुट संपूर्ण ६७३८ चौ.फुट (हॉस्पीटलसाठी देणे आहे)

तळ मजला - २३७० चौ.फुट (कॅन्टीनसाठी)

संपर्क : महेश शिरसे मो. 8390628414, चंद्रकांत वाहूळकर मो. 8766471201



## Change in Name

My (old name) PRATIBHA which now I am changing as( New Name) PRATIBHA NARAYAN NILKANTHWAR Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same. Address ::PRATIBHA NARAYAN NILKANTHWAR ND 2, 1W 4/10 Kranti Chowk CIDCO new Nanded Maharashtra 431603 Mobile No. 9423138793

## Change in Name

My old name ATMARAM VITTHALRAO BAGAL which now I am changing as New Name ATMARAM VITTHAL BAGAL Hence forth my all correspondance will be done as per my New Name. Please consider the same. Address: KAKANDI, NANDED MAHARASHTRA-431602

Mobile No. 9561817162


# विद्यार्थ्यांसाठी एसटीची खास हेल्पलाईन सुरू



**मुंबई (प्रतिनिधी) –** शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एसटी प्रवासातील अडचणी एका फोनद्वारे सोडवता याव्यात, यासाठी राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने स्वतंत्र हेल्पलाइन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. महामंडळाने विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर केला आहे. हा क्रमांक बातमीत देण्यात आला आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत राज्य सरकार एसटीच्या माध्यमाने शालेय विद्यार्थ्यांना घर ते शाळा ये-जा करण्यासाठी मासिक पासात सुमारे ६७ टक्के सवलत देते. मात्र, अनेकदा एसटी फेऱ्यांची वानवा, बस वेळेत न येणे, बस रद्द असणे यांमुळे विद्यार्थ्यांना पायपीट करत किंवा अन्य पर्यायाने शाळा गाठावी लागते. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या सोलापूर दौऱ्यात शालेय विद्यार्थिनींनी एसटीच्या फेऱ्यांचा गोंधळ त्यांच्यासमोर मांडला होता.

शालेय बस वेळेवर न सुटणे, बसकडून शाळेचा थांबा चुकवणे, बसगाड्या अचानक रद्द करणे यांसह शालेय प्रवासातील तक्रार विद्यार्थ्यांना करता यावी, यासाठी एसटी महामंडळाने हेल्पलाइन क्रमांक जारी केला आहे. राज्यातील ३१ विभागांतील सर्व विभाग नियंत्रकांचे दूरध्वनी क्रमांक संबंधित शाळा आणि महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. आपत्कालीन स्थितीत शाळा-महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि विद्यार्थी यांनी थेट संपर्क साधून अडचणी आणि समस्या सोडवणे शक्य होणार आहे. एसटी विद्यार्थी हेल्पलाइन क्रमांक सर्व एसटी बस स्थानक आणि आगारात लावण्यात येणार असून, विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचे महामंडळाने आवाहन केले आहे.

एसटी फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामुळे जितके दिवस विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल तितके दिवस संबंधित एसटी अधिकाऱ्यांचे निलंबन करा, अशा सूचना परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या वाहतूक विभागाला दिल्या आहेत.

अधिकाऱ्यांवर कारवाई होणार-आगार व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक यांनी सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी ५-६ वाजता मुख्य बसस्थानक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात चढ-उतार होत असलेल्या ठिकाणी गणवेशात उपस्थित राहावे. शालेय बस फेऱ्यांच्या गैरव्यवस्थापनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास तितक्या दिवसांचे निलंबन किंवा सक्तीच्या रजेवर एसटी अधिकाऱ्यांना पाठवावे. विद्यार्थी-विद्यार्थीनींसह शाळा-महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांनी तक्रार आल्यास संबंधित पर्यवेक्षक, आगार व्यवस्थापक आणि संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे, अशा सूचना परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी महामंडळाच्या वाहतूक महाव्यवस्थापकांना दिल्या आहेत.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व हितसंबंधीताना या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, शिवाजी नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेडचे सभासद प्रशांत विश्वनाथ जोशी यांचे भुखंड ३०-६० फुट दुमजली घर म.न.पा. क्र. १-२-१७० असून भूखंडाचा पी. आर. कार्ड नं. ४४८१ असा आहे.

सदरील वर्णनाचा भुखंड व त्यावरील दुमजली घर श्रावणी रमेश रेंगे यांनी निवासासाठी खरेदी केला आहे. कार्यकारीणी सभेने मान्यता दिली आहे या मान्यतेनुसार कन्व्हेंन्स डीड करण्यात आली आहे.

ज्या कोणास या हस्तांतरणास आक्षेप असल्यास पुराव्यासह १४ दिवसांच्या आत संस्थेचे कार्यालय शिवनेरी शिवाजीनगर, नांदेड येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीत दाखल करावेत. (जाहिरात प्रकाशित झालेल्या तारखेपासून). नमुद कालावधीमध्ये आक्षेप दाखल न झाल्यास अर्जदाराचे नांव संस्थेच्या रजिस्ट्रीला नोंदवण्यात येईल, याची नोंद घ्यावी. वरील मुदतीनंतर आलेले आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सदरील जागा व घराचे वर्णन-

तळमजला व पहिला मजला आर.सी.सी. बांधकाम

त्याची चतु:सिमा-

पूर्वेस : गोरे यांचे घर, पश्चिमेस : डॉ. रेंगे यांचे घर

दक्षिण : मनपा रस्ता, उत्तरेस : मोकळी जागा व फुले नगर

सचिव अध्यक्ष

श्री. शिवाजीनगर, सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादित, नांदेड.

## Change in Name

My Old Name is AMOL S/o PANDURANG JADHAV which now I am changing as New Name AMOL PANDURANGRAO JADHAV Hence forth my all Correspondance will be done as per my new name I.E. AMOL PANDURANGRAO JADHAV Please consider the Same. Address: Plot 6, Row House Gut No. 142 Saraswati Nagar, Taroda Bk. Nanded

## Change in Name

MY OLD NAME IS NARSING CHITMALWR Which now I am Changing as New Name: NARSINGRAO GANPATRAO CHITMALWAR Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same. Sign By : NARSINGRAO GANPATRAO CHITMALWAR Address-Ward No. 11, H. No. 19, Main Road Mondha Area Umri, Umri Nanded, Maharashtra.

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# प्रेम प्रकरणातून सक्षम ताटेचा खून; गोळ्या घालून खून केल्याचेही तपासात उघड



## पाच आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जुन्या नांदेड शहरातील पहेलवान टी हाऊस परिसरात प्रेम प्रकरणातून गुरुवारी संघसेननगर येथील सक्षम गौतम ताटे (वय २५) याचा युवतीच्या कुटुंबीयांनी गोळ्या झाडून तसेच डोक्यात फरशी घालून खून केल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात आतापर्यंत पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. त्यातील दोन मुख्य सूत्रधारांना स्थानिक गुन्हा शाखा व इतवारा पोलिसांनी परभणी जिल्ह्यातील मानवत येथून जेरबंद केले आहे. या प्रकरणाच्या तपासाची दिशा आता स्पष्ट झाली आहे. या प्रकरणात अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा अन्वयेही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेसह पाच आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायाधीश एस. डी. तावशीकर यांनी तीन दिवसाच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे.

गुरुवारी सायंकाळी सक्षम गौतम ताटे या युवकाचा गजानन बालाजीराव मामीडवार (वय ४५), साहिल मदनसिंह ठाकूर उर्फ साहिल गजानन मामीडवार (वय २५) तसेच इतर आठ ते नऊ जणांनी 'मुली सोबत का बोलतोस' या कारणावरून गोळ्या झाडून खून केला. घटनास्थळी गोळीबार झाल्याचे गुरुवारी स्पष्ट झाले होते; मात्र हा गोळीबार कोणी केला होता हे पोलिसांनी उघड केले नव्हते. ही बाब आता शवविच्छेदनानंतर स्पष्ट झाली आहे. आरोपितांनी सक्षमवर दोन गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी सक्षमच्या कमरेस लागली. त्यात तो जखमी झाल्यानंतर त्याच्या डोक्यात फरशी घालून डोक्याचा चेंदामेंदा करण्यात आला. यात तो जागीच ठार झाला होता.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपींना तात्काळ अटक करण्याचे स्थानिक गुन्हा शाखेला आणि इतवारा पोलिसांना आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय आणि इतवारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ आणि गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर चव्हाण यांच्या पथकाने वेगवेगळ्या भागात आरोपींचा शोध सुरू केला. त्यानुसार पोलिसांनी मानवतमधून गजानन बालाजी मामीडवार आणि साहिल मदनसिंह ठाकूर उर्फ साहिल गजानन मामीडवार या दोघांना ताब्यात घेतले. त्यांनी व इतर आरोपीतांनी संगणमत करून आणि कट रचून सक्षम ताटे याचा खून केल्याचे कबूल केले. या प्रकरणात पाच जणांसह इतर चौघाविरुद्ध खून आणि अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. आता आरोपींना तपासीक अंमलदार तथा उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

### स्वारातीम विद्यापीठातील नाट्य विभागाने जिंकली प्रेक्षकांची मने

# 'तो ती मनोहर' नाटकाला मोठा प्रतिसाद





**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच शहरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात पार पडली. दि.१६ नोव्हेंबरला सुरुवात झालेल्या या स्पर्धेची सांगता दि.२७ नोव्हेंबर रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ललित व प्रयोगजीवी कला संकुलातील नाट्य व चित्रपट विभागाच्या विद्यार्थ्यांच्या नाटकाने झाली. विद्यार्थी लेखक व दिग्दर्शक अतुल साळवे यांच्या 'तो ती आणि मनोहर' या नाटकाला नांदेडच्या नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. अक्षरशः शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह हाऊसफुल्ल झाले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील नाट्य व चित्रपट विभागातील एम. ए. नाट्यशास्त्र अभ्यासक्रमातील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी संचालक डॉ पृथ्वीराज तौर व नाट्य व चित्रपट विभागाचे प्रा. राहुल जयप्रकाश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली 'तो ती आणि मनोहर' या नाटकाची निर्मिती केली आहे.

यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरु डॉ अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, संचालक डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. पी. विठ्ठल व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही नाटकाला उपस्थित राहुन विद्यार्थी कलावंतांचा उत्साह वाढवला. विजय गजभारे, सपना वाघमारे, मानसी बेलापुरकर, राहुल मोरे, चंद्रकांत तोरणे, करन गुडेवार यांनी आपल्या कसदार अभिनयाने प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवले.

'तो ती आणि मनोहर' या नाटकाचे लेखन-दिग्दर्शन-विद्यार्थी अतुल साळवे यांनी केले, तर निर्मीती प्रमुखाची जबाबदारी नाट्य विभागातील प्रा. राहुल गायकवाड यांनी सांभाळली.

या नाटकाची प्रकाश योजना - माणिकचंद थोरात, रंगभूषा - सौ द्वारका साळवे, वेशभूषा- कांचन वसेकर, नेपथ्य- राहुल गायकवाड व संगीत अतुल साळवे यांनी केले, तर मंच व्यवस्थापनाची जबाबदारी नागेश सोनकांबळे, रोहन पंडित, अमित सोनकांबळे, निलेश गच्चे, अजिंक्य जाधव, सुनिल ममदापुरे, सचिन थोटे, सुमित सोळंके, गजेस्विनी देलमाडे यांनी पार पाडली.

# किनवटमध्ये प्रभागांसाठी जोरदार रस्सीखेच; प्रचार शिगेला

**किनवट (प्रतिनिधी)–** पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात विविध प्रभागांत जोरदार रस्सीखेच सुरु आहे. कांही प्रभागात दुरंगी, तिरंगी तर कांही प्रभागांत बहुरंगी लढती होणार आहेत. प्रभाग क्रं. ४ अ मध्ये सर्वाधिक ९ उमेदवार रिंगणात आहेत.

किनवट पालिकेच्या २१ जागांसाठी ९० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. प्रभाग क्रं.१ अ मध्ये दुरंगी, १ ब मध्ये चौरंगी, २ अ मध्ये ६ जणांत तर ब मध्ये ५ जणांत लढत आहे. प्रभाग ३ अ मध्ये चौरंगी, ब मध्ये पंचरंगी, प्रभाग ४ अ मध्ये ९ उमेदवार असल्याने या प्रभागात बहुरंगी लढत होणार आहे. ४ ब मध्ये ६ उमेदवारांत लढत आहे. प्रभाग ५ अ मध्ये तिरंगी, ५ ब मध्ये दुरंगी, ६ अ मध्ये तिरंगी तर ब मध्ये अटीतटीची पंचरंगी लढत होत आहे. ७ अ मध्ये ६ जणांत तर ब मध्ये तिरंगी लढत आहे. ८ अ आणि ब मध्ये दुरंगी लढत आहे. प्रभाग क्र. ९ अ मध्ये तिरंगी तर ब मध्ये पंचरंगी लढत आहे. तर प्रभाग क्रं.१० अ मध्ये पंचरंगी, ब मध्ये ६ जणांत तर क मध्ये तिरंगी लढत होत आहे.

**प्रभाग ७ ब च्या लढतीकडे सर्वांचे लक्ष**

शहराच्या बहुचर्चित प्रभाग क्रं. ७ ब मध्ये माजी उपनगराध्यक्ष तथा भाजपचे उमेदवार श्रीनिवास किशराव नेम्मानीवार व ठाकरे सेनेचे श्रीनिवास यादवराव नेम्मानीवार यांच्यात चुरशीची लढत होत आहे. या 'हाय व्होल्टेज' लढतीकडे सबंध शहराचे लक्ष लागून आहे. विशेष म्हणजे वरील दोन्ही उमेदवारांनी नगराध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठी दावा केला होता. आजघडीला प्रभागात दोघांत तुल्यबळ लढत आहे. प्रतिष्ठेच्या या लढतीत कोणत्या श्रीनिवासचा विजय होईल, याची सर्वांना उत्सुकता लागली आहे.

# बजाजनगरमध्ये श्री दत्त जयंती महोत्सवाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या बजाजनगर भागात श्री दत्त मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री दत्त जयंती महोत्सवाचे २८ नोव्हेंबरपासून ते चार डिसेंबरपर्यंत आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

दि. २८ नोव्हेंबर रोजी काकड आरती व श्री दत्त अभिषेक श्री गुरुचरित्र पारायण दुपारी चार ते सहा दरम्यान भजन महिला मंडळी बजाजनगर आणि रात्री आठ ते दहा पंचपदी, दि. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी काकड आरती, श्री गुरुचरित्र पारायण, महिला भजनी मंडळ आणि पंचपदी, रविवार दिनांक ३० नोव्हेंबर रोजी प्राध्यापक विलासराव गारोळे यांचा संगीत रजनी कार्यक्रम. एक डिसेंबर रोजी काकड आरती, गुरुचरित्र पारायण, महिला भजनी मंडळ आणि पंचपदी, दोन डिसेंबर रोजी काकड आरती, गुरुचरित्र पारायण, पंचपदी, ३ डिसेंबर रोजी हेच कार्यक्रम आणि चार डिसेंबर रोजी काकड आरती गुरुचरित्र पारायण, पालखी मिरवणूक तसेच कीर्तनकार रामकृष्ण गोविंद जानकर महाराज आणि सायंकाळी सहा वाजता श्री जन्म किर्तन व जन्मोत्सव आणि दत्त पालखी परिक्रमा होणार आहे.

त्यानंतर पाच डिसेंबर रोजी शुक्रवारी सायंकाळी पाच वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमाला या भागातील दत्त भक्तांनी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री दत्त मंदिर प्रतिष्ठान व हनुमान मंदिर प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी केले आहे.



**नांदेड** - शिवसेनेचे खा. श्रीकांत शिंदे हे नांदेड दौऱ्यावर आले असता त्यांनी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या 'राजगड' जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विधान परिषद गटनेते मंत्री आ. हेमंत पाटील, आ. आनंदराव बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, सौ. सरस्वतीबाई पाटील बोंढारकर, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : बैस)

**पान १ वरून...**

## शुक्रवार आठवडी बाजार...

सदरील कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त स.अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात पालिकेच्या अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. या कारवाईत उपविभागीय पोलिस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी व त्यांचे पोलीस सहकारी, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, गौतम कवडे, मिर्झा बेग, राजेश जाधव, निलावती डावरे यांच्यासह पालिकेचे २५० कर्मचारी तसेच १५० पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

शहरातील साठे चौक ते आय.टी.आय. तसेच शिवाजीनगर ते ज्योती टॉकीज त्याचप्रमाणे गोकुळनगर ते रेल्वेस्टेशन व आनंदनगर ते महादेव दाल मील या मार्गावरुन जाताना येथील बाजारामुळे वाहतुकीची होणारी कोंडी तसेच भरधाव वाहनांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी या आठवडी बाजाराचे स्थलांतर करणे आवश्यक होते. सदरील आठवडी बाजार स्थलांतरीत केल्याने व्यापाऱ्यांसह नागरीकांकडुन समाधान व्यक्त केले जात आहे. तसेच यापुढे सुध्दा व्यापारी व शेतकरी बांधवांनी शुक्रवारचा आठवडी बाजार मुख्य मार्गावर न भरवता पालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या पर्यायी जागेत अर्थात इंदिरा गांधी मैदार व रोड नं.२६ वर भरविण्याचे आवाहन पालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# जालना-छपरा विशेष गाडीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)** – दक्षिण मध्य रेल्वेने जालना-छपरा-जालना या विशेष रेल्वेगाडीला मुदतवाढ देण्याचे ठरविले आहे. त्यानुसार जालना – छपरा विशेष गाडी(०७६५१) दि. ०३ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान दर बुधवारी जालना रेल्वे स्थानकावरून रात्री २३.३५ वाजता सुटणार आहे आणि छत्रपती संभाजीनगर, मनमाड, भुसावळ, खंडवा, हरदा, इटारसी, पिपरिया, गाडरवाडा, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज चवकी, विंध्याचल, वाराणसी, औणरिहर, गाझीपूर सिटी, बलिया मार्गे छपरा येथे शुक्रवारी सकाळी ९:५० वाजता पोहोचेल.

छपरा – जालना विशेष गाडी (०७६५२) दि. ०५ डिसेंबर २०२५ ते २ जानेवारी २०२६ दरम्यान दर शुक्रवारी छपरा रेल्वे स्थानकावरून रात्री १०.१५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गाने जालना येथे रविवारी सकाळी ९.५० वाजता पोहोचेल.

# डोक्यात दगड घालून खून केल्याप्रकरणी परप्रांतीय मजुराला आठ वर्षांची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरापासून जवळच असलेल्या लिंबगाव रेल्वे पुलावर एका व्यक्तीचा डोक्यात दगड मारुन खून करणाऱ्यास येथील दुसरे अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. डी. तावशीकर यांनी आठ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणातील मारेकरी मध्यप्रदेशमधून मजुरी करण्यासाठी महाराष्ट्रात आला होता.

या प्रकरणात राहुल धारु इंगोले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ११ फेब्रुवारी २०२० रोजी अविनाश बबन इंगोले (वय २५) याला पुणे येथे जायचे होते. म्हणून त्यांना नाळेश्वर येथून दुचाकीवर घेवून दोघे जण आले होते. लिंबगाव रेल्वे स्थानकावर गाडी उशीरा येणार होती म्हणून त्यांना पुढे नाळेश्वर चौकात सोडण्यासाठी जात असतांना लिंबगाव जवळील रेल्वे रुळांवर असलेल्या पुलाजवळ नांदेडकडून एक ट्रॅव्हल्स आली. आणि त्या गाडीला आम्ही हात दाखवला. ती गाडी थांबली आणि अविनाश बबन इंगोले हे गाडीत बसत असतांना तेथे रुळावर थांबलेल्या एका व्यक्तीला त्यांनी विचारले 'तू विनाकारण गाड्या थांबवत आहेस, लोकांना का मारत आहेस' असे म्हणत झालेल्या वादानंतर त्या व्यक्तीने अविनाशच्या डोक्यात दगड घातला. यानंतर अविनाश हा गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती लिंबगाव पोलिसांना समजतात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी अवस्थेत त्याला नांदेडच्या विष्णुपुरी येथील रुग्णालयात दाखल केले. मारेकरी काळूराम दिलदार जाटव (वय ३०) रा. खिरीया ता. गाढरवारा जि. नरसींहपुर (मध्यप्रदेश) असे आहे. सोबतच जखमी अवस्थेतील अविनाश इंगोले याच्यावर सुध्दा उपचार सुरू होता. पण उपचारा दरम्यान १२ फेब्रुवारी रोजी त्याचा मृत्यू झाला. या संदर्भाने लिंबगाव पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ प्रमाणे गुन्हा क्रमांक ८१/२०२० दाखल केला.

पोलीस उपनिरीक्षक गणेश गोटके आणि त्यांचे सहकारी पोलीस अंमलदार प्रकाश पेद्देवाड यांनी तपास करून काळूराम जाटव विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. न्यायालयात या प्रकरणी आठ साक्षीदारांनी आपले जबाब नोंदवले. उपलब्ध पुराव्या आधारे सरकारी वकील ॲड. यादव तळेगावकर यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीश एस. डी. तावशीकर यांनी मारेकऱ्याला आठ वर्षांची शिक्षा सुनावली. विशेष म्हणजे आरोपी हा अटकेपासून शिक्षा सुनावणीपर्यंत कारागृहातच होता.

# ऑटोचालकाचा प्रामाणिकपणा; विसरलेला किमती मोबाईल केला परत



**नांदेड (प्रतिनिधी)–** ऑटो प्रवासात विसरलेला मोबाईल ऑटो चालकाने प्रवाशी महिलेच्या स्वाधीन करीत प्रामाणिकपणाचा प्रत्यय दिला.

प्रामाणिकपणा हा आजच्या काळात दुर्मिळ होत चाललेला असला तरी अजूनही समाजामध्ये काही माणसं अशा चारित्र्याची आहेत, जी इतरांसाठी आदर्श ठरतात. असाच एक सकारात्मक आणि प्रेरणादायी अनुभव नांदेडमध्ये २८ नोव्हेंबर रोजी दुपारी दीड वाजता घडला.

टायगर ऑटो रिक्षा चालक संघटनेचे सदस्य रिक्षा चालक शेख महेबूब (करीम) रा. देगलूर नाका हे ऑटो रिक्षा चालक आपल्या दररोजच्याप्रमाणे प्रवासी घेऊन जात होते. त्यांच्याच रिक्षामध्ये ४ महिला प्रवास करत होत्या. त्यातील संगीता राजेंद्र पिंपरे (रा. लातूर जिल्हा) ह्या प्रवाशी बस स्टॉप ते गुरुद्वारा दर्शनासाठी जात होत्या.

प्रवासादरम्यान (एमएच २६ बीडी ९४३३) रिक्षातून उतरून घाईघाईने गुरुद्वाराकडे गेल्यावर मोबाईल रिक्षातच विसरून राहिल्याचे संगीता पिंपरे यांच्या लक्षात आले. त्यांनी त्यांच्या मोबाईलवर फोन केला असता संबंधित रिक्षाचालक शेख महेबूब (करीम) यांनी फोन उचलून ताई फोन आपला रिक्षामध्येच आहे, असे सांगितले. लगेच ही माहिती टायगर संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अहेमद (बाबा) यांना देण्यात आली. ते गुरुद्वारा येथे आले. २४ हजार हजार रुपयांचा मोबाईल परत केला.

# आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाच्या तयारीचे राजभवन स्पर्धा निरीक्षण समितीकडून विद्यापीठात परीक्षण



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दि. ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान २७ वा महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव होत आहे. या क्रीडा महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या स्थापन करून तयारी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दि. २८ नोव्हेंबर रोजी राज्यपाल नियुक्त राजभवन स्पर्धा परीक्षा निरीक्षण समितीने विद्यापीठाच्या क्रीडा सुविधांचे निरीक्षण केले.

या समितीने विविध विभागांकडून अद्यावत माहिती घेत संपूर्ण तयारीचे परीक्षण केले. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून दापोली येथील डॉ. अरुण माने, तर सदस्य म्हणून छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सचिन देशमुख आणि मुंबई येथील आदित्य कुलकर्णी उपस्थित होते.विद्यापीठातील क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी समितीसमोर क्रीडा महोत्सवाच्या तयारीचा विस्तृत आढावा सादर केला.

या क्रीडा महोत्सवात कब्बडी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ आणि थलेटिक्स यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांचा समावेश असून, राज्यभरातील विद्यापीठांमधून अंदाजे ५००० खेळाडू सहभागी होणार आहेत. अशा राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत कुलगुरू डॉ. चासकर आणि क्रीडा संचालक डॉ. माने यांनी व्यक्त केले आहे.

क्रीडांगणे अद्ययावत करण्यासाठी कार्यकारी अभियंता तानाजी हुसेकर यांच्यासह डॉ. मनोज पैजने, हिरामण वाघमारे, राजासाहेब बोराळे, अरुण इंगोले, केशव कल्याणकर, प्रदीप बिडला तसेच विविध समित्यांचे अध्यक्ष, सदस्य, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com